दैनिक **संध्या**

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

७० वर्ष — निर्भीड पत्रकारीतेची

रविवार, दि. ०५ जुलै २०२६

www.dainikesandhya.com | www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : १९० | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये


# उद्धव ठाकरे यांना चांगली बुद्धी सुचली!

## हिंदुत्वाचे हे विचार थोडे दिवस तरी टिकवून ठेवावेत; चंद्रशेखर बावनकुळेंची जोरदार टीका

**नागपूर (दै. संध्या)**



अयोध्येतील राम मंदिराच्या बांधकामातील कथित अनियमितता आणि दानपेट्यांच्या चोरीच्या मुद्यावरून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी पाच तारखेला राज्यभरात 'घंटानाद' आणि 'रामरक्षा आंदोलन' करण्याची घोषणा केली आहे. त्यांच्या या घोषणेवर आता भाजप नेते चंद्रशेखर बावनकुळे यांनी जोरदार निशाणा साधला आहे. "मतांचे लांगूलचालन आणि काँग्रेससोबतची अभद्र युती टिकवण्यासाठी प्रभू रामचंद्राकडे पाठ फिरवणाऱ्या ठाकरेंना आता उशिरा का होईना चांगली बुद्धी सुचली आहे. त्यांनी हिंदुत्वाचे हे विचार थोडे दिवस तरी टिकवून ठेवावेत," असा खोचक टोला बावनकुळे यांनी लगावला आहे. बावनकुळे यांनी नागपुरात आयोजित पत्रकार परिषदेत राज्यातील विविध घडामोडींवर सविस्तर भाष्य केले.

उद्धव ठाकरेंच्या रामरक्षा आंदोलनावर टीका करताना बावनकुळे म्हणाले, "जेव्हा संपूर्ण देश आणि राज्याचा आग्रह होता की उद्धव ठाकरेंनी अयोध्येला जावे, तेव्हा त्यांनी तिकडे बघणेही टाळले. काँग्रेसच्या नेत्यांना वाईट वाटेल आणि आपली काँग्रेस-राष्ट्रवादीसोबतची अभद्र युती बिघडेल, या भीतीने त्यांनी प्रभू रामचंद्राशी फारकत घेतली होती. मतांच्या लांगूलचालनासाठी त्यांनी हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरेंचे विचारही सोडले."

"आता पक्षातील खासदार, आमदार आणि हिंदुत्ववादी कार्यकर्ते सोडून जात असल्यामुळे केवळ त्यांचा रोष कमी करण्यासाठी आणि राजकीय फायद्यासाठी ठाकरेंनी हे आंदोलन पुकारले आहे. नवनीत राणा यांनी हनुमान चालिसा पठण केले तेव्हा त्यांना 14 दिवस तुरुंगात टाकणाऱ्या ठाकरेंना आता रामाची आठवण आली आहे. उशिरा का होईना त्यांना चांगली बुद्धी सुचली आहे, आता ती त्यांनी काही काळ तरी टिकवून ठेवावी, नाहीतर ते पुन्हा काँग्रेसच्याच मार्गावर जातील."

साकीनाका मॅनहोल दुर्घटनेवर भाजप आमदार अमित साटम हसल्याच्या प्रकरणावर आणि मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी केलेल्या टीकेवर बावनकुळे यांनी साटम यांची पाठराखण केली. "अमित साटम हे अत्यंत प्रगल्भ आणि संवेदनशील नेते आहेत. ते कधीही एवढ्या मोठ्या घटनेवर हसणार नाहीत किंवा असे हावभाव करणार नाहीत. बोलताना अनेक विषय येतात, त्यामुळे संदर्भाची गल्लत झाली असावी. त्यांच्या बोलण्याचा विपर्यास केला जात असून, लोकांनी हा गैरसमज दूर करावा," असे बावनकुळे म्हणाले.

### महसूल व आरटीओ (RTO) मधील गैरव्यवहार

नागपूर ग्रामीण आरटीओमध्ये अरुणाचल प्रदेश, नागालँड आणि लक्षद्वीपमधून अवैध पद्धतीने 2000 ट्रक रजिस्टर झाल्याच्या प्रकरणावर त्यांनी चिंता व्यक्त केली. "याबाबत मलाही काही कुणकुण लागली होती. परिवहन मंत्री म्हणून प्रताप सरनाईक यांनी यावर योग्य ती कारवाई सुरू केली असून, रेती माफिया आणि चोरीच्या वाहनांचा वापर करणाऱ्यांना पकडण्याचे प्रयत्न सुरू आहेत," असे ते म्हणाले.



## सूर्यवंशीने सचिन-शेफालीचा विक्रम मोडला; 15 वर्षे, 99 दिवसांत केले पदार्पण

**मुंबई (दै. संध्या)**

वैभव सूर्यवंशी भारतासाठी सर्वात कमी वयात पदार्पण करणारा भारतीय क्रिकेटपटू बनला आहे. तो १५ वर्षे ९९ दिवसांच्या वयात इंग्लंडविरुद्ध पहिला आंतरराष्ट्रीय सामना खेळत आहे. वैभवने शेफाली वर्मा आणि सचिन तेंडुलकरचा विक्रम मोडला. शेफालीने १५ वर्षे २३९ दिवसांच्या आणि सचिनने १६ वर्षे २०५ दिवसांच्या वयात भारतासाठी पहिला सामना खेळला होता.

सामन्यापूर्वी वैभवने सोशल मीडियावरही पदार्पणाचे संकेत दिले होते. शुक्रवारी त्याने त्याच्या इंस्टाग्राम अकाउंटच्या स्टोरीवर स्वतःचा फोटो शेअर करत 'न्यू चॅप्टर' असे लिहिले होते.

२३ जून रोजी बीसीसीआयने वैभवला टीम इंडियाची ३ नंबरची जर्सी दिली. थ्रोडाउन स्पेशलिस्ट रघुने त्याला जर्सी दिली. सूर्यवंशीने आधी रघुच्या पायांना स्पर्श करून नमस्कार केला, मग जर्सी घेतली.

आयसीसीच्या चाइल्ड सेफगार्डिंग पॉलिसीनुसार, वैभवला इंग्लंड दौऱ्यावर वेगळा चेंजिंग रूम देण्यात आला आहे. त्याच्या कुटुंबालाही टीम हॉटेलमध्ये राहण्याची परवानगी मिळाली आहे.

## 6 जुलैपर्यंत मुसळधार पाऊस-वादळाचा धोका: गरज असेल तरच बाहेर पडा : मुख्यमंत्री

**मुंबई (दै. संध्या)**



मुंबईसह राज्यभरात पावसाने जोरदार हजेरी लावली असून, मुंबई महानगर प्रदेशात सलग कोसळणाऱ्या पावसामुळे जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. पावसाचा हा जोर अपेक्षेपेक्षा जास्त असून, येत्या 6 तारखेपर्यंत हे संकट कायम राहणार असल्याची माहिती राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. तसेच, नागरिकांनी प्रशासनाच्या सूचनांचे पालन करून अनावश्यक प्रवास टाळावा, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

गेल्या काही दिवसांपासून मुंबई आणि उपनगरांना पावसाने अक्षरशः झोडपून काढले आहे. रस्त्यांवर पाणी साचल्याने वाहतुकीचा वेग मंदावला असून, रेल्वे सेवेवरही याचा मोठा परिणाम झाला आहे. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून प्रशासनाने आधीच मुंबई आणि ठाण्यातील शाळांना सुट्टी जाहीर केली आहे.

शनिवारी आंतरराष्ट्रीय सहकार दिनानिमित्त आयोजित 'सहकार गौरव पुरस्कार' सोहळ्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हजेरी लावली. या कार्यक्रमानंतर माध्यमांशी बोलताना त्यांनी राज्यातील पावसाच्या स्थितीवर सविस्तर माहिती दिली. मुख्यमंत्री म्हणाले, "राज्यात सध्या मुसळधार पाऊस सुरू असून आम्ही हाय अलर्ट जारी केला आहे. नागरिकांनी हा अलर्ट फॉलो करावा आणि गरज नसेल तर प्रवास टाळावा, अशी माझी विनंती आहे."

पावसाच्या या संकटातच दोन दिवसांपूर्वी मुंबई-पुणे 'कनेक्टिंग लिंक'वर दोन खड्डे पडल्याचे समोर आले होते. यावरून विरोधकांनी सत्ताधाऱ्यांवर जोरदार टीकास्त्र सोडले होते. या टीकेला उत्तर देताना मुख्यमंत्र्यांनी विरोधकांना चांगलेच सुनावले.

फडणवीस म्हणाले, "कनेक्टिंग लिंकवर जिथे रस्ते जोडले जातात, तिथे दोन खड्डे पडले आहेत. पूर्ण लिंकवर खड्डे पडलेले नाहीत. काम पूर्ण झाल्यावर पावसाळ्यात दुसरी लेअर टाकली जाते आणि त्यामध्ये काही तांत्रिक अडचणी तपासून पाहिल्या जातात. ही एक इंजिनिअरिंग प्रोसेस आहे.

## कर्जमाफीत एकही शेतकरी वंचित राहणार नाही: मुनगंटीवार

**नागपूर (दै. संध्या)**



राज्य सरकारने जाहीर केलेल्या कर्जमाफीच्या निर्णयाचे भाजपचे ज्येष्ठ नेते आणि माजी अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी स्वागत करत, "एकही पात्र शेतकरी कर्जमुक्तीपासून वंचित राहणार नाही," असा विश्वास व्यक्त केला. तर राम मंदिरातील कथित चोरीच्या प्रकरणात "चोरी करणाऱ्यांना योगी आदित्यनाथ सरकार कायद्याप्रमाणे कठोर शिक्षा करेल," असेही त्यांनी स्पष्ट केले. याचवेळी चंद्रपूरमधील भाजपच्या अंतर्गत राजकारणावर मात्र बोलण्यास त्यांनी स्पष्ट नकार देत, "त्या विषयावर मी प्रतिज्ञा केली आहे, आता एक शब्दही बोलणार नाही," अशी भूमिका घेतली. पत्रकार परिषदेत त्यांनी कर्जमाफीपासून राम मंदिर, वैधानिक विकास मंडळ, चंद्रपूर भाजपमधील घडामोडी आणि विदर्भाच्या विकासापर्यंत विविध विषयांवर भूमिका मांडली.

राज्य सरकारने जाहीर केलेल्या 56 लाख शेतकऱ्यांसाठीच्या सुमारे ३६ हजार कोटी रुपयांच्या कर्जमाफीबाबत विचारलेल्या प्रश्नावर मुनगंटीवार म्हणाले की, हा अत्यंत महत्त्वाचा निर्णय आहे. काही तांत्रिक अडचणी किंवा नियमांमुळे कोणताही पात्र शेतकरी वंचित राहू नये, याची काळजी सरकार घेणार आहे. कृषिमंत्री दत्तामामा भरणे यांनी विधानसभेत स्पष्टपणे सांगितल्याप्रमाणे, नियमांच्या कारणामुळे कोणताही शेतकरी कर्जमुक्तीपासून वंचित राहणार नाही, असे त्यांनी सांगितले. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या नावाने सुरू करण्यात आलेल्या या योजनेत सामान्य शेतकऱ्याला न्याय मिळेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

राम मंदिरातील कथित चोरीच्या प्रकरणावर बोलताना मुनगंटीवार यांनी आपल्या राम मंदिर आंदोलनातील सहभागाची आठवण करून दिली. ते म्हणाले, राम मंदिर उभारणीसाठी आपण अनेक वर्षे आंदोलन केले. कारसेवेत सहभागी झालो, लग्नाच्या स्वागत समारंभातही "मंदिर वही बनाएंगे" असा संकल्प केला होता. वनमंत्री असताना मंदिरासाठी सागवान लाकूडही पाठवले. मात्र, मंदिरातील दानपेटीत किंवा अन्यत्र चोरी झाली असेल, तर ती अत्यंत दुर्दैवी घटना आहे. देव त्याला त्याची शिक्षा देईलच, पण सरकार म्हणून कायद्यानेही कठोर कारवाई होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनीही अशा प्रकारच्या आरोपींना कोणतीही सवलत दिली जाणार नसल्याचे अनेकदा स्पष्ट केले आहे. त्यामुळे दोषींना कायद्यानुसार शिक्षा होईल, असे मुनगंटीवार म्हणाले.

चंद्रपूरमधील भाजपच्या संघटनात्मक बदलांबाबत आणि स्थानिक वादांबाबत विचारले असता मुनगंटीवार यांनी अत्यंत स्पष्ट शब्दांत उत्तर दिले. ते म्हणाले की, त्या घटनांचा आपण साक्षीदार नव्हतो. त्यामुळे संबंधितांनीच त्यावर प्रतिक्रिया द्यावी. आता चंद्रपूर जिल्ह्याची जबाबदारी भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्याकडे आहे. त्यामुळे त्या संदर्भातील सर्व प्रश्न त्यांनाच किंवा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विचारावेत. पत्रकारांनी वारंवार प्रश्न विचारल्यानंतर त्यांनी विनोदी शैलीत उत्तर दिले, "फिजिक्सच्या पुस्तकात केमिस्ट्रीचा धडा वाचू नका. मी बोलणार नाही, अशी प्रतिज्ञाच केली आहे."

संघटनात्मक राजकारणापासून आपण अलिप्त राहत असलो तरी जनतेच्या प्रश्नांवर मात्र पूर्वीप्रमाणेच काम करत राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. धान बोनस, वैधानिक विकास मंडळ, उद्योग, बेरोजगारी, पिण्याचे पाणी आणि विदर्भाच्या विकासासंबंधी सर्व प्रश्न आपण सातत्याने मांडणार असल्याचे त्यांनी सांगितले. "पक्षाने तिकीट दिले, पण जनतेने निवडून दिले. त्यामुळे जनतेच्या प्रश्नांसाठी लढणे ही माझी जबाबदारी आहे," असेही ते म्हणाले.


क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा

SUBSCRIBE

e-paper www.sandhyaepaper.com


### ढिंग-टांग




पक्षाच्या धोरणाला विरोध म्हणून यांनी आपला पक्ष सोडून नवीन पक्ष स्थापन केला. आता समविचारी पक्ष म्हणून आपल्याबरोबर युती व्हावी, अशी त्यांची इच्छा आहे!

## सब्र का फल मिठा होता है: ज्या पदासाठी थांबलो ते 8-10 दिवसांत मिळणार

# रायगडच्या पालकमंत्रिपदाबाबत गोगावलेंचे सूचक विधान

**मुंबई (दै. संध्या)**



रायगडच्या पालकमंत्रिपदावरून गेल्या अनेक महिन्यांपासून सुरू असलेल्या राजकीय तिढ्यावर आता लवकरच पडदा पडण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. शिवसेना शिंदे सेनेचे आमदार भरत गोगावले यांनी "ज्या पदासाठी आम्ही थांबलो होतो, ते येत्या आठ ते दहा दिवसांत मिळणार आहे," असे सूचक वक्तव्य करत रायगडच्या पालकमंत्रिपदाबाबत मोठा दावा केला आहे. त्यामुळे रायगडच्या पालकमंत्रिपदाची घोषणा आता अंतिम टप्प्यात असल्याची चर्चा पुन्हा रंगली आहे.

गेल्या काही दिवसांपासून रायगडच्या पालकमंत्रिपदावरून राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना शिंदे सेना यांच्यात रस्सीखेच सुरू आहे. राष्ट्रवादीचे मंत्री सुनील तटकरे यांचे कुटुंब आणि शिवसेनेचे आमदार भरत गोगावले यांच्यातील स्थानिक राजकीय स्पर्धेमुळे हा वाद अधिकच गाजला. महायुती सरकारमध्ये दोन्ही पक्षांकडून रायगडवर दावा करण्यात आल्याने पालकमंत्रिपदाचा निर्णय अनेक महिन्यांपासून प्रलंबित राहिला आहे.

एका कार्यक्रमात बोलताना भरत गोगावले म्हणाले, "आम्ही ज्या पदाची वाट पाहत होतो, ते आता मिळणार आहे. येत्या आठ ते दहा दिवसांत त्याची घोषणा होईल. काळजी करण्याचे कोणतेही कारण नाही."

यावेळी त्यांनी "सब्र का फल मीठा होता है" असे म्हणत आपल्या समर्थकांना संयम बाळगण्याचा सल्लाही दिला. "घाई करायची नाही. पुढची टर्मही महायुतीची आणायची असेल तर वरिष्ठ नेतृत्वाच्या सल्ल्यानुसारच सर्वांनी काम करावे," असेही त्यांनी सांगितले.

काही दिवसांपूर्वी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रायगडच्या शिवसेना पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत भरत गोगावले यांच्यासह स्थानिक आमदारांना पालकमंत्रिपदाबाबत सकारात्मक संकेत दिल्याची माहिती समोर आली होती. योग्य वेळी रायगडच्या पालकमंत्रिपदाचा निर्णय घेतला जाईल आणि शिवसैनिकांवर अन्याय होणार नाही, असे आश्वासन शिंदे यांनी दिल्याचे सांगितले जाते.

त्यानंतर गोगावले यांनी केलेल्या ताज्या वक्तव्यामुळे शिंदेंच्या आश्वासनाची अंमलबजावणी आता प्रत्यक्षात होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

रायगड जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सुनील तटकरे यांचे मजबूत राजकीय वर्चस्व आहे. दुसरीकडे, महाड मतदारसंघाचे आमदार भरत गोगावले हे एकनाथ शिंदे यांचे अत्यंत विश्वासू सहकारी मानले जातात. त्यामुळे पालकमंत्रिपद कोणाकडे जाणार, याकडे महायुतीतील दोन्ही पक्षांचे लक्ष लागले होते.

स्थानिक विकासकामे, प्रशासकीय निर्णय आणि जिल्ह्यातील राजकीय प्रभाव या दृष्टीने पालकमंत्रिपद महत्त्वाचे मानले जात असल्याने हा वाद केवळ पदापुरता मर्यादित न राहता स्थानिक राजकीय वर्चस्वाच्या लढाईतही परिवर्तित झाला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या पातळीवर याबाबत अनेकदा चर्चा झाल्याची माहिती आहे. महायुतीतील समन्वय बिघडू नये म्हणून हा निर्णय वारंवार पुढे ढकलण्यात आला होता.

मात्र आता भरत गोगावले यांनी केलेल्या सूचक वक्तव्यामुळे रायगडच्या पालकमंत्रिपदाचा तिढा अखेर सुटण्याची शक्यता निर्माण झाली आहे. पुढील आठवडाभरात सरकारकडून अधिकृत घोषणा होणार का, याकडे आता महायुतीतील कार्यकर्त्यांसह रायगड जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

## पक्षाच्या विलीनीकरणाचा कुठलाही विचार नाही:शशिकांत शिंदे यांची स्पष्टोक्ती, दोन गट असल्याच्या चर्चाही फेटाळल्या

**मुंबई (दै. संध्या)**



राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी पक्षाच्या विलीनीकरणाच्या चर्चांना पूर्णविराम देत, "काँग्रेसमध्ये जाण्याचा किंवा पक्षाचे विलीनीकरण करण्याचा कुठलाही विचार नाही," असे स्पष्ट शब्दांत सांगितले. गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या राजकीय चर्चांना त्यांनी केवळ अफवा ठरवत, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली अधिक आक्रमकपणे संघटन बांधणीवर लक्ष केंद्रित करत असल्याचे सांगितले.

पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील पक्ष पदाधिकाऱ्यांच्या बैठकीनंतर आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी राज्यातील राजकीय परिस्थिती, विरोधकांची भूमिका, राम मंदिरातील कथित गैरव्यवहार, मुंबईतील पावसाची परिस्थिती, कायदा-सुव्यवस्था आणि विधिमंडळाच्या कामकाजावरही सरकारवर जोरदार टीका केली.

गेल्या काही दिवसांपासून राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षातील काही नेते सत्तेत जाण्याच्या विचारात आहेत किंवा काँग्रेसमध्ये विलीन होण्याची चर्चा सुरू असल्याच्या बातम्या समोर येत आहेत. यावर शशिकांत शिंदे यांनी ठाम भूमिका मांडली.

ते म्हणाले की, शरद पवार यांच्या विचारांवर पक्षाची वाटचाल सुरू असून सध्याच्या राजकीय परिस्थितीत सक्षम विरोधी पक्ष म्हणून मोठी संधी राष्ट्रवादी काँग्रेसला मिळणार आहे. त्यामुळे पक्ष संघटना अधिक मजबूत करण्यावर भर दिला जात असून विलीनीकरणासंदर्भात कोणतीही चर्चा झालेली नाही.

सतत अशा प्रकारच्या बातम्या कोण पसरवत आहे? असा सवालही त्यांनी उपस्थित केला. विरोधी पक्षांमध्ये संभ्रम निर्माण करण्यासाठी आणि कार्यकर्त्यांचे मनोबल खच्ची करण्यासाठी जाणीवपूर्वक अशा चर्चा रंगवल्या जात असल्याचा आरोप शशिकांत शिंदे यांनी केला.

पक्षाच्या संघटनात्मक बांधणीवर भर देत शशिकांत शिंदे म्हणाले की, गेल्या महिनाभरापासून मुंबईसह राज्यभर बैठका सुरू आहेत. येत्या काळात राज्य कार्यकारिणी आणि जिल्हा कार्यकारिणीत काही महत्त्वाचे बदल करण्यात येणार असून १५ ऑगस्टनंतर सुप्रिया सुळे, पक्षाचे खासदार, आमदार आणि वरिष्ठ नेते राज्यव्यापी दौरा करणार आहेत.

या दौऱ्याद्वारे प्रत्येक जिल्ह्यात संघटना मजबूत करण्याचे आणि कार्यकर्त्यांपर्यंत थेट पोहोचण्याचे नियोजन असल्याचे त्यांनी सांगितले.

राम मंदिरातील कथित देणगी चोरीच्या आरोपांवरून उद्धव ठाकरे यांनी सुरू केलेल्या रामरक्षा आंदोलनालाही शशिकांत शिंदे यांनी पाठिंबा दर्शविला.

ते म्हणाले की, रामाचे नाव, मंदिराचे नाव आणि धर्माचा वापर करून सत्ता मिळवायची आणि नंतर त्याच माध्यमातून पैसा कमवायचा, असा नवीन प्रकार सुरू झाला आहे. २०१४ पासून राम मंदिराचा मुद्दा निवडणुकांमध्ये वापरला गेला, मात्र आता देणग्या आणि मंदिर व्यवस्थापनाबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत असल्याचे त्यांनी म्हटले. राम मंदिरातील कथित गैरव्यवहाराबाबत राष्ट्रीय स्वयंसेवक संघानेही चिंता व्यक्त केल्याचा उल्लेख करत, संबंधितांवर अद्याप कारवाई का झाली नाही? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. तसेच हा विषय केवळ राम मंदिरापुरता मर्यादित नसून इतर काही मंदिरांबाबतही आर्थिक अनियमिततेचे आरोप होत असल्याचे त्यांनी सांगितले.

# संपादकीय

## महिलांच्या श्रमाचा सन्मान

देशातील ग्रामीण भागात आर्थिक दृष्ट्या सक्रिय असलेल्या एकूण महिलांपैकी ८० टक्क्यांहून अधिक महिला प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे शेती आणि पूरक व्यवसायांमध्ये कार्यरत आहेत. शेतीत काम करणाऱ्या एकूण महिलांपैकी ४८ टक्के महिला कौटुंबिक शेतीत काम करतात, तर ३३ टक्के महिला कृषी मजूर आहेत. उर्वरित महिला पशुपालन आणि दुग्ध व्यवसायात आहेत. कृषी जनगणनेनुसार भारतातील एकूण शेतजमिनींपैकी केवळ १३.९६ टक्के शेतजमीन महिलांच्या नावावर आहे. प्रत्यक्ष लागवडीखालील क्षेत्राचा विचार केल्यास हे प्रमाण ११.७२ टक्के आहे. 'पीएम किसान' योजनेच्या आकडेवारीनुसार, एकूण लाभार्थ्यांमध्ये केवळ २५ टक्के महिला लाभार्थी आहेत. कारण, ही योजना जमिनीच्या मालकीशी जोडलेली आहे. ज्याच्या नावावर सातबारा तोच शेतकरी अशी व्याख्या रूढ आहे. बँकिंग यंत्रणा, कर्जपुरवठा आणि पीक विमा याच व्याख्येवर आधारित आहेत. जमीन नावावर नसल्यामुळे दिवस-रात्र शेतात राबूनही लाखो महिला कायद्याच्या नजरेत केवळ मजूर ठरतात. कुटुंबातील पुरुषाच्या मृत्यूनंतर जमीन मुलांच्या नावावर करण्याची प्रथा होती.

या वारसा हक्काच्या आणि कौटुंबिक कायद्यांच्या गुंतागुंतीमुळे महसूल विभागाला थेट हस्तक्षेप करून केवळ काम करणाऱ्या महिलांना स्वतंत्र अधिकार देणे कायदेशीरदृष्ट्या कठीण जात होते. भारतात कृषी धोरणे आणि योजना आखताना 'शेतकरी कुटुंब' हा एक घटक मानला गेला. कुटुंबांतर्गत स्त्री की पुरुष असा फरक केला गेला नाही. यामुळे कुटुंबाचा प्रमुख म्हणून पुरुष हाच सर्व सरकारी लाभ आणि कर्जाचा चेहरा बनला. महिलांच्या श्रमाला कौटुंबिक कर्तव्याचा भाग मानले गेल्याने त्यांना स्वतंत्र 'आर्थिक उत्पादक' म्हणून कायदेशीर मान्यता देण्याची गरज आजवरच्या सरकारांना जाणवली नाही.

या पार्श्वभूमीवर पावसाळी अधिवेशनात 'महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक २०२६' मंजूर करून फडणवीस सरकारने ऐतिहासिक पाऊल टाकले आहे. शेती क्षेत्रातील महिलांच्या योगदानाची दखल घेत असे धोरणात्मक पाऊल टाकणारे महाराष्ट्र देशातील पहिले राज्य ठरले. या कायद्याने ७५ वर्षांची जुनी 'जमीन मालकीची अट' मोडीत काढून, केवळ शेतीत काम करण्याच्या निकषावर महिलांना 'शेतकरी' म्हणून कायदेशीर मान्यता देण्यात येणार आहे. संयुक्त राष्ट्राने २०२६ हे वर्ष 'इंटरनॅशनल इयर ऑफ द वुमन फार्मर' म्हणून घोषित केले असताना महाराष्ट्राने हा ऐतिहासिक कायदा केला. कृषी अथवा कृषीसंलग्न क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांना 'शेतकरी' म्हणून ओळख मिळावी, हा या विधेयकाचा मुख्य उद्देश आहे. महिला शेतकऱ्यांची स्वतंत्र ओळख निर्माण करून त्यांना आर्थिक सक्षम करण्याचा हा प्रयत्न आहे. गेल्या काही दशकांत ग्रामीण भागातून लाखो पुरुष रोजगारासाठी शहरांत आले. यामुळे गावातील शेतीची धुरा महिलांच्या खांद्यावर आली. निर्णय घेण्यापासून ते प्रत्यक्ष कष्ट करण्यापर्यंत महिलाच आघाडीवर राहिल्या. जमिनीची मालकी बदलत नाही, तोपर्यंत महिलांना शेतकरी मानता येणार नाही, या कायदेशीर चौकटीत प्रशासन अडकले होते. बाजारव्यवस्थेत एखादी व्यक्ती आर्थिक निर्णय घेण्यास आणि स्वतःच्या श्रमाचा थेट आर्थिक लाभ मिळवण्यास स्वतंत्र नसते, तोपर्यंत तिला 'उत्पादक' मानले जात नाही. हे विधेयक याच मानसिकतेवर आणि धोरणात्मक त्रुटीवर प्रहार करणारे आहे. सकाळी उठून स्वयंपाक करणे, पाणी भरणे, शेण काढणे, त्यानंतर कुटुंबासोबत शेतात पेरणी, लावणी, कोळपणी ही कामे महिला वर्षानुवर्षे करत आल्या; पण त्याला घरगुती कर्तव्याचा भाग मानले गेले. दुसऱ्याच्या शेतात कष्ट करून मजुरी मिळवणाऱ्या श्रमाची गणना आर्थिक म्हणून केली जायची; पण घरातील महिला कौटुंबिक शेतात १० ते १२ तास राबूनही तिला थेट पगार किंवा रोख मोबदला मिळत नसल्यामुळे अर्थशास्त्राच्या परिभाषेत त्यांचे हे योगदान 'बिगर आर्थिक' होते. हा मोठा दोष होता. शेतात राबणाऱ्या महिलेची नोंद सरकारी कागदपत्रांमध्ये 'गृहिणी' अशी असेल, तर ती देशाच्या उत्पादक श्रमशक्तीचा भाग नाही, असा प्रशासनाचा समज होता. यामुळे धोरणकर्त्यांना महिलांच्या स्वतंत्र आर्थिक अस्तित्वाची जाणीवच झाली नाही.

## संस्कृत सुभाषित

य: शास्त्रविधिमृत्सृज्य वर्तते कामकारत:।
न स सिद्धिमवाप्नोति न सुखं न परांगतिम्।।

जो शास्त्राचे नियम झुगारून देऊन विषयोपभोगांच्या इच्छेप्रमाणे वर्तन करतो, तो सदैव अपयशी होतो, दु:खी होतो व त्याला श्रेष्ठ गती प्राप्त होत नाही.

## गुरु वचन

### समान भावाने सेवा

एका वेळची गोष्ट आहे. ईश्वरचंद विद्यासागर यांच्याजवळ त्यांच्या मित्राचा एक नोकर काही कामानिमित्त आला. विद्यासागर बाहेर आले आणि त्यांनी पाहिले तर घराच्या खाली एक वयस्कर व्यक्ती उभा होता. आणि तो खूप थकलेला होता. अशा स्थितीत तो वरती येण्यास असमर्थ होता. हे पाहून विद्यासागर त्या व्यक्तीसाठी पिण्यास पाणी घेऊन आले आणि परत जाऊन पंखा घेऊन आले आणि स्वत: हवा मारु लागले. विद्यासागरना असे करताना पाहून त्यांचा मित्र म्हणाला ज्या व्यक्तीस आपण पाणी पाजत आहात आणि पंख्याने हवा मारत आहात तो एक सामान्य सेवक आहे. मित्राचे हे बोलणे ऐकून विद्यासागर म्हणाले ठीक आहे, हा एक सेवक आहे, परंतु माणूसच आहे. यावरुन विद्यासागर यांनी मित्राला आपल्या लहानपणीची एक गोष्ट सांगितली, माझे वडील एकदा बाजारात चक्कर येऊन पडले. तेथे चन्ना विकणाऱ्या एका व्यक्तीने आपले काम सोडून ताबडतोब पाणी आणले आणि त्याचा शिडकावा मारला आणि नंतर पंखा आणून त्याने हवाही मारु लागला, असे करत असताना तो आपले सामानही विसरुन गेला. त्याला केवळ माझ्या वडिलांची चिंता होती. थोड्याच वेळात जेव्हा माझे वडील उठून बसले. तेव्हा त्यांनी त्या व्यक्तीचे आभार मानले. या घटनेमुळे मी एवढा प्रभावित झालो की, त्यानंतर कोणत्याही व्यक्तीची मदत करणे आपला धर्म मानला. शेवटी माझ्यासाठी ही गोष्ट कोणतेच बंधन ठेवत नाही की, कोणी व्यक्ती उच्च जातीचा आहे की, खालच्या जातीचा आहे. छोटा असो व मोठा मी सर्वांना समान समजतो. आणि त्यांची समान भावानेच सेवा करतो.

## उपदेशकथा

### जिद्द

डॉ. येलप्रगदा सुब्बाराव हे आंध्रप्रांतातील एक विख्यात वैद्य होते. त्यांच्या घरची परिस्थिती गरिबीची होती. त्यांच्या भावाचा मृत्यू स्प्रू म्हणजे प्रवाहिका नावाच्या रोगाने झाला. त्यावर त्यावेळी औषध नसल्याने ते औषध तयार करण्याची त्यांनी प्रतिज्ञा केली व ती शेवटी सिद्धीस नेली. मद्रास विद्यापीठाची डॉक्टरेट पदवी मिळविली. मित्रमंडळींच्या सहाय्याने ते इंग्लंडला गेले. लंडन विद्यापीठात प्रवेश केला. नंतर अमेरिकेतील हार्वर्ड विद्यापीठात प्रवेश मिळवून १९३० मध्ये त्या विद्यापीठाची डॉक्टरेट पदवी मिळविली. तेथेसुद्धा पैशाच्या अडचणीमुळे हॉस्पिटलमधील शिपायाचे काम करणे, प्रयोगासाठी बेवारशी कुत्री व मांजरे पकडणे वगैरे हलकी कामे करावी लागली पण त्यांनी त्यात कमीपणा मानला नाही. दूध व शिजवलेले पावटे हा त्यांचा आहार होता. लॅडर्ली लॅबोरेटरीचे १९४२ मध्ये प्रमुख झाले. टेरॉटेरिन व ॲमिनॉप्टिरिन नावाची कर्करोगावर व ल्युकेमियावर उपयोगी पडणारी औषधे त्यांनी तयार केली. लेडर्ली संस्थेतील वाचनालयास व भारतातील त्या कंपनीच्या कारखान्यास त्यांचे नाव देण्यात आले.

कथा उपदेश : जिद्दीने प्रतिकूल परिस्थितीवर मात करता येते व नाव कमावता येते.

## पंचांग

पंचांग
५ जुलै २०२६
रविवार
विक्रम संवत्– २०८२
निज ज्येष्ठशके
संवत्– १९४८
संवत्सर –पराभवनाम
अयन– दक्षिणयन
मास– निज ज्येष्ठ
ऋतु– सौर वर्षा
कृष्ण पक्ष
तिथि:पंचमी १३:३१:०३
नक्षत्र:शतभिषा
१५:१२:२६
योग:आयुष्मान
१६:३९:३१
करण:तैतिल १३:३१:०३
करण:गर २५:४३:५२+
सूर्य:मिथुन
चन्द्र:कुम्भ
हिजरी सन् – १४४८
मुस्लिम मास – मोहरम
तारीख – १९
विशेष
शुभ दिवस

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. १००१

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 3 | 7 | 4 | 8 | 1 | |
| | | | | 5 | | | | 2 |
| 5 | | | | 9 | 2 | | | 3 |
| | 5 | | | | | 3 | 2 | 9 |
| | | 2 | 5 | 8 | 9 | 6 | | |
| 9 | 4 | 6 | | | | | 8 | |
| 1 | | | 9 | 6 | | | | 4 |
| 7 | | | | 2 | | | | |
| | 6 | 3 | 4 | 1 | 5 | | | |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

सूडोकु क्र. १००० चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 6 | 7 | 2 | 9 | 4 | 3 | 5 | 1 | 8 |
| 1 | 9 | 8 | 5 | 2 | 7 | 4 | 6 | 3 |
| 4 | 5 | 3 | 1 | 8 | 6 | 7 | 9 | 2 |
| 9 | 3 | 7 | 2 | 6 | 1 | 8 | 5 | 4 |
| 2 | 8 | 1 | 4 | 3 | 5 | 6 | 7 | 9 |
| 5 | 4 | 6 | 7 | 9 | 8 | 2 | 3 | 1 |
| 3 | 6 | 5 | 8 | 1 | 2 | 9 | 4 | 7 |
| 8 | 1 | 4 | 6 | 7 | 9 | 3 | 2 | 5 |
| 7 | 2 | 9 | 3 | 5 | 4 | 1 | 8 | 6 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १६८७ – सर आयझेक न्यूटनने फिलोसॉफि नॅचरालिस प्रिन्सिपिया मॅथेमॅटिका हे अतिमहत्त्वाचे पुस्तक प्रकाशित केले.
- १७७० – चेस्माची लढाई.
- १८११ – व्हेनेझुएलाला स्पेनपासून स्वातंत्र्य.
- १८३० – फ्रांसने अल्जिरीयावर आक्रमण केले.
- १९७५ – आर्थर एश विम्बलडन टेनिस स्पर्धा जिंकणारा प्रथम श्यामवर्णीय व्यक्ती झाला.
- २००७ – चीनच्या ल्योनिंग प्रांतात एक संगीत पार्लरमध्ये झालेल्या भीषण स्फोटात २५ जण ठार झाले.

### राष्ट्रीय

- २००७ – माहिती तंत्रज्ञान, आरोग्य आणि शिक्षण क्षेत्रात भारताची क्षमता दर्शवणारी एक महत्वाकांक्षी पॅन आफ्रिकी ई नेटवर्क योजनेस केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजूरी दिली.
- २००७ – वर्कप्लॅनअंतर्गत ऊस विकास कार्यक्रम ही केंद्र पुरस्कृत योजना राज्यात २००७-०८ मध्ये राबविण्यासाठी राज्य शासनाने ९७७.८५ लाख रुपयांचा निधी मंजूर केला.

### जन्म

- १८५३ – सेसिल ऱ्होड, दक्षिण आफ्रिकेचा राजकारणीचा जन्म.
- १९४६ – राम विलास पासवान, केंद्रीय मंत्रीचा जन्म.
- १९५४ – जॉन राइट, न्यूझीलंडचा क्रिकेट खेळाडू व प्रशिक्षाकाचा जन्म.

### निधन

- १६६६ – आल्बर्ट सहावा, बव्हारियाचा राजा यांचे निधन.
- १९४५ – जॉन कर्टीन, ऑस्ट्रेलियाचा १४वा पंतप्रधान यांचे निधन.

## : SMS :

Why Akshay Kumar's wife is not a big star as he is?

Because

Twinkle Twinkle Little Star!

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३०.१ | २४.२ |
| अहमदनगर | २९.८ | २२.८ |
| अकोला | ३२ | २५ |
| अमरावती | २७.१ | २४.८ |
| बीड | ३६.९ | २४.४ |
| भंडारा | ३३.५ | २५.५ |
| बुलढाणा | ४३.९ | ३०.३ |
| चंद्रपूर | ३६.५ | २४.९ |
| चेन्नई | ३९.१ | ३०.१ |
| नवी दिल्ली | ४२.९ | ३६.४ |
| धुळे | ३६.३ | २५.५ |
| गोंदिया | २७.७ | २५.२ |
| जळगाव | ३१.७ | २४.६ |
| कोल्हापूर | २६.४ | २२.४ |
| लातूर | ३०.१ | २२.८ |
| मुंबई | ३४.४ | ३०.१ |
| नागपूर | ३३.१ | २४.७ |
| नांदेड | ३४ | २४.३ |
| नंदूरबार | २९.८ | २५ |
| नाशिक | २५.७ | २३.१ |
| पुणे | २४.७ | २३ |
| पंढरपूर | ३१.६ | २४.२ |
| सातारा | २६.५ | २१.५ |
| सांगली | २७.४ | २३.३ |
| सोलापूर | ३३.३ | २४.६ |
| वर्धा | ३४.४ | २४.९ |
| वाशिम | ३२.५ | २३.५ |
| यवतमाळ | ३३.३ | २४.५ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** तुमच्या नैतिक जबाबदारीमध्ये भर पडल्याने घरातील काही प्रश्नांकडे तुम्हाला लक्ष वळवावे लागेल.

**तूळ :** कामे खूप असतील पण प्रकृतीचा विचार करता ती नियोजनबद्ध आणि टप्प्याटप्प्याने केलीत तर त्याचा आनंद घेता येईल.

**वृषभ :** तुमच्यातील आशावाद वाढेल. पूर्वी रखडलेली कामे आता पुढे सरकतील. व्यापारामध्ये पुढील प्रगतीच्या दृष्टीने काही पैसे गुंतवणे भाग पडेल.

**वृश्चिक :** जरी खर्च वाढले तरी ते चांगल्या कारणाकरता असल्याने तुमची तक्रार नसेल. नोकरीत सगळ्यांशी हितसंबंध चांगले राखून मतलब साध्य कराल.

**मिथुन :** व्यापारीवर्गाने अतिलोभापोटी मोहात टाकणाऱ्या काही क्षणांपासून जपणे आवश्यक आहे. नोकरीतील बदल तुमच्या पथ्यावरच पडतील.

**धनू :** दिसते तसे नसते. वातावरण तुमच्या प्रगतीला पूरक वाटत असले तरी ते बदलायला वेळ लागणार नाही.

**कर्क :** तुमच्या कार्यक्षेत्रात काही महत्त्वाच्या बदलांची नांदी होण्याची शक्यता. त्याचे दूरगामी परिणाम काय होतील याचा विचार करून तुम्ही निर्णय घ्या.

**मकर :** कुटुंबवत्सल हा तुमचा पिंड नसला तरी घराकरता तुम्हाला वेळ काढावा लागेल. व्यापारात स्पर्धकांवर मात करण्याकरता नवीन धोरण स्वीकाराल.


**सिंह :** एकीकडे तुम्ही उत्साहाने काम कराल तर दुसरीकडे अवचित खर्चाने बुचकळ्यात पडाल. या दोन्हींचा समन्वय साधलात तर तुमचे बेत सफल होतील.

**कुंभ :** जाहिरात, इतर तंत्रांचा खुबीने वापर केलात तर व्यापारातील उलाढाल वाढेल. नोकरीमध्ये मानसिक शांतता लाभल्याने कामाचा ताण जाणवणार नाही.

**कन्या :** व्यापारउद्योगात बाजारातील परिस्थिती तुम्हाला पूरक अशी असल्याने प्रत्येक लाभदायक संधीचा फायदा तुम्ही उठवाल.

**मीन :** व्यापार-उत्पन्नाच्या नवीन संधीच्या शोधात असणाऱ्यांना तशी संधी मिळेल. नोकरीमध्ये चांगल्या पद्धतीने काम केल्याचा आनंद मिळेल.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. १००१



### आडवे शब्द

१. ब्लडप्रेशरला मराठी शब्द
४. आपला-परका असा भेद (भाव)
७. श्वापद, पशू
११. भ्रमंती
१३. डवरणे, भरून येणे
१४. फणसाचा एक प्रकार
१६. पादत्राण
१७. देशी दारू
१८. पूर्णपणे
१९. यांच्यासारखे सख्य म्हणजे पूर्ण वैरच की!
२२अ. पेशव्यांची राजधानी
२४. खंदक २५. खुंटी, मेख
२६. सत्य २९. आजूबाजूला
३०. सांघिक व्यायाम
३२. अनुमती ३४. घोडा
३५. स्वत:च्या नावे कालगणना सुरू करणारा राजा
३७. रोम
३९. कवी बा.भ. बोरकर यांची नादमधुर कविता- 'गडद निळे, गडद निळे --- भरूनि आले'
४१. गुडघ्याखाली येणारा हार
४४. दारूच्या आहारी गेलेला
४६. समाधान पावलेला
४७. दूध वा दूधाचे पदार्थ
४८. थडगे ५०. गुणज्ञ
५२. खवा ५३. बडबड्या
५५. माळ, हार
५७. देह ५९. मज्जाव
६०. पातळ खांब
६२. कपाळभर लावलेले कुंकू
६३. वागणूक
६४. वाईटाचे मंत्रतंत्र
६६. क्षमता, ताकद
६७. धमनी ६९. लक्ष्मी
७१. संताप ७३. बागवान
७४. बासरी ७६. गणपती
७७. किरकोळ सामान

### उभे शब्द

१. चैत्रवमीचा अवतार
२. मोठी जाड सुई
३. लट, परंतु (इंग्रजी)
४. आमिरचे बंबईय्या भाषेतील पर्यटनगीत!-'-- क्या खंडाला?
५. प्रचीती, अनुभव
६. बासुंदीपेक्षा हल्ली ही लोकप्रिय
७. स्त्रियांसाठी पूर्वी वापरले जाणारे विशेषण
८. धातूचे चलन
९. झाडाच्या चिकापासून मिळणारा चिवट पदार्थ
१०. अळूच्या भाजीत ही पालेभाजी हवीच!
१२. उबग, सुस्ती
१५. उपवासाचा कंद
१८. ही उपाधी मिरवण्यासाठी पुण्यात केवळ वास्तव्य असणे पुरेसे नाही!
१९. विकासपथावर असलेला
२०. नको त्या गोष्टीत नाक खुपसणारी
२१. कालच्या आधीचा दिवस
२२. 'स्वामी'कार रणजित देसाईंच्या पत्नी माधवी देसाई यांचे आत्मकथन- '-- गं घुमा'
२३. गाईचे पिल्लू २५. पाप
२७. तमाशातील प्रश्नोत्तरे
२८. ही टाकणे म्हणजे पड
२९. ध्वनी ३१. यश देणारे
३३. आश्चर्य ३६. रवाळ
३८. सतत तक्रार करणारा
४०. करूणा, कीव
४१. अंगमेहनत करून निर्वाह करणारा
४२. घराणे
४३. हस्त
४५. तात्पुरते रुसणे
४७. पणजीचे राज्य
४८. वेदनेची तिडीक
४९. जीभ ५१. दार
५२. आत्या
५४. एक पालेभाजी
५६. श्रीमंत
५७. मंदवासर
५८. छोटा फोड
५९. चितन
६१. उंट हाकणारा
६२. मनाला आलेला थकवा
६५. भडीमार
६८. समतल
७०. तपास, शोध
७२. फक्त, केवळ
७३. चंद्राची कड
७५. घाव, प्रहार

उत्तर उद्याच्या अंकात

### जम्बो शब्दकोडे क्र. १००० चे उत्तर

आडवे उत्तर : १.दाब ३.गगनभेदी ८.वास १०.भास १२.हिमालय १४.गरजवंत १६.रानवट १८.पारंगत २०.नाग २१.रासभ २२.हयात २४.वडीलधारी २६.ताई २७.टरफल २९.पाचर ३०.पर ३२.वारस ३३.जननमरण ३५.लस ३७.माई ३८.नीरस ४०.सट ४१.महाल ४२.पडसाद ४३.ऊस ४४.वीर ४५.कप्पा ४६.नरवर ४९.महामाता ५१.होन ५३.कर ५५.चकणा ५६अ.कस ५७.पराक्रम ५९.कलेवर ६१.कलाकार ६३.जाजम ६४.तरु ६५.तापट ६७.काळवीट ६९.दादर ७२.कारभार ७३.समता ७४.कलमदान ७७.हालहवाल ७८.साल ७९.कट ८०.पाटीलकी

उभे उत्तर : २.बहिरभट ३.गलत ४.गय ५.भेग ६.दीर ७.सवंगडी ९.सरासरी १०.भाव ११.सटवाई १३.माग १५.जनावर १७.नभ १९.पाया २१.राधा २२.हलवाई २३.तपासनीस २५.लहानसहान २६.तारणहार २८.रजा ३०.परमवीरचक्र ३१.कलप ३४.नट ३६.सड ३७.मादकता ३९.सहायक ४७.रजपज ४८.वीणा ४९.मधुकर ५०.मानवता ५२.नकलाकार ५४.रट्टा ५६.कमतरता ५६ब.सकाळ ५८.रामदास ६०.रपका ६२.रवी ६६.टरफल ६८.टकमक ७०.दमदाटी ७१.मंगल ७४.कल ७५.दाट ७६.बाकी

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे - ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### 3 दिवसांत खडकवासला प्रकल्पात अर्धा टीएमसी पाणीसाठा जमा

पुणे (दैनिक संध्या) : घाटमाथ्यावर सुरू असलेल्या जोरदार पावसामुळे खडकवासला प्रकल्पातील चारही धरणांच्या पाणलोट क्षेत्रात शुक्रवारी (दि. ३) दिवसभर दमदार पाऊस झाला. या पावसामुळे पाण्याचा येवा वाढला असून दिवसभरात २१३ दशलक्ष घनफूट अर्थात पाव टीएमसी पाणी जमा झाले आहे. हे पाणी शहराला चार दिवस पुरेल इतके आहे. दरम्यान, चारही धरणांमुळे एकूण पाणीसाठा ४.१८ टीएमसी अर्थात सुमारे साडेचौदा टक्के इतका झाला आहे. गेल्या तीन दिवसांमध्ये चारही धरणांतील मिळून सुमारे अर्धा टीएमसी पाणीसाठा जमा झाला आहे. संपूर्ण जून महिना कोरडा गेल्यानंतर जुलैच्या सुरुवातीपासूनच पावसाने काहीसा जोर धरला आहे. गुरुवारी खडकवासला प्रकल्पातील चारही धरणांच्या पाणलोट क्षेत्रात मध्यम स्वरूपाचा पाऊस झाला. तर गुरुवारी रात्री व शुक्रवारी सकाळी, तसेच दिवसभर पावसाची संततधार सुरू होती. पाणलोट क्षेत्रात दिवसभरात जोरदार पावसाच्या सरी पडल्या. यामुळे पानशेत धरणाच्या पाणलोट क्षेत्रात ६३ व वरसगाव धरणाच्या पाणलोट क्षेत्रात ६१ मिलिमीटर पावसाची नोंद करण्यात आली. टेमघर धरणाच्या परिसरात ४३ मिलिमीटर पाऊस पडला, तर खडकवासला प्रकल्पाच्या क्षेत्रात ११ मिलिमीटर पावसाची नोंद झाली. या पावसामुळे सकाळी सहा ते सायंकाळी पाच वाजेपर्यंत २१३ दशलक्ष घनफूट पाणी जमा झाले. पाण्याचा येवा वाढल्यामुळे सध्या चारही धरणांत मिळून ४.१८ टीएमसी अर्थात १४.३४ टक्के पाणीसाठा झाला आहे. जलसंपदा विभागाने दिलेल्या आकडेवारीनुसार गुरुवारी सकाळी सहा वाजता संपलेल्या २४ तासांमध्ये १९५ दशलक्ष घनफूट पाणी जमा झाले होते.



### पुणे तिथे काय उणे..! भर पावसात झाडांना टँकरने पाणी

पुणे (दैनिक संध्या) : पुणे शहरातील पौड रोड मेट्रो स्टेशन परिसरात प्रशासनाच्या कामकाजाचा विचित्र नमुना समोर आला आहे. मुसळधार पाऊस सुरू असतानाच झाडांना टँकरद्वारे पाणी घातल्याचा प्रकार नागरिकांनी कॅमेऱ्यात कैद केला असून, त्याचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. पावसामुळे परिसरात आधीच पाणी साचलेले असतानाही टँकरमधून झाडांना पाणी दिले जात असल्याचे व्हिडिओमध्ये दिसत आहे. त्यामुळे नागरिकांनी आश्चर्य व्यक्त करत प्रशासनाच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. "जेव्हा निसर्गच झाडांना भरभरून पाणी देत आहे, तेव्हा टँकरची गरज काय?" असा सवाल अनेकांनी उपस्थित केला आहे. या घटनेनंतर सोशल मीडियावर विविध प्रतिक्रिया उमटत असून, काहींनी या प्रकाराची खिल्ली उडवली आहे. तर काही नागरिकांनी हा सरकारी निधी आणि मनुष्यबळाचा अपव्यय असल्याची टीका केली आहे. दरम्यान, संबंधित विभागाकडून याबाबत कोणतेही अधिकृत स्पष्टीकरण देण्यात आलेले नाही. मात्र, व्हायरल झालेल्या या व्हिडिओमुळे प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली आहे. नागरिकांनी या प्रकरणाची चौकशी करून जबाबदारांवर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

### शिक्षकांचे तब्बल 5 कोटी वेतन थकवले; मारुती नवलेंसह विश्वस्तांवर गुन्हा दाखल

पुणे (दैनिक संध्या) : सिंहगड टेक्निकल एज्युकेशन सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांविरोधात शिक्षकांचे तब्बल ५ कोटी ६ लाख ८३ हजार ४१८ रुपयांचे वेतन थकवून आर्थिक फसवणूक, धमकी आणि विश्वासघात केल्याप्रकरणी भारती विद्यापीठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी आरती अमित पुरंदरे (४५, रा. शुक्रवार पेठ, पुणे) यांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार संस्थेचे संस्थापक मारुती निवृत्ती नवले, सचिव सुनंदा मारुती नवले, उपाध्यक्ष रचना नवले ऊर्फ अष्टेकर, उपाध्यक्ष रोहित मारुती नवले, अकाऊंट विभागातील संजय मोरे, शरद जराड तसेच इतर विश्वस्तांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादीनुसार, त्या सिंहगड स्प्रिंग डेल स्कूल, आंबेगाव कॅम्पस येथे २००९ पासून शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. एप्रिल २०२० ते मे २०२२ या २६ महिन्यांच्या कालावधीत ८० टक्के वेतन तसेच फेब्रुवारी २०२५ ते जून २०२६ या कालावधीत १५ महिन्यांचे संपूर्ण वेतन संस्थेने दिले नाही. फिर्यादींचे १९ लाख ३६ रुपये, तर अन्य २६ शिक्षकांचे ४ कोटी ८७ रुपये, असा एकूण ५ कोटी ६ लाख रुपयांचा पगार थकविण्यात आल्याचा आरोप आहे. तक्रारीत आणखी नमूद करण्यात आले आहे की, प्रत्यक्षात वेतन न देता ते दिल्याचे दाखवून अर्ज-१६ जारी करण्यात आले आणि टीडीएसही कापण्यात आला. त्यामुळे शिक्षकांसह शासनाचीही आर्थिक फसवणूक झाली. वेतनाची मागणी केल्यावर नोकरीवरून काढून टाकण्याची धमकी, अपमानास्पद वागणूक तसेच जीवे मारण्याची धमकी दिल्याचाही आरोप फिर्यादींनी केला आहे. हा प्रकार एप्रिल २०२० पासून आजपर्यंत घडल्याचे तक्रारीत नमूद असून, भारती विद्यापीठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अद्याप कोणालाही अटक करण्यात आलेली नसून पोलिस पुढील तपास करीत आहेत.




# प्रॉप तर्फे' प्रॉप कनेक्ट २०२६' राष्ट्रीय परिषदेचे उद्या आयोजन

## उदयन माने यांची पत्रकार परिषदेत माहिती; देशभरातील दोन हजारांहून अधिक रियल्टर्स, ३०० विकसक सहभागी होणार

पुणे (दै. संध्या)

दी प्रोफेशनल रियल्टर्स ऑफ पुणे (प्रॉप) आणि नॅशनल असोसिएशन ऑफ रियल्टर्स-इंडिया (नार-इंडिया) यांच्या संयुक्त विद्यमाने 'प्रॉप कनेक्ट २०२६' या देशातील सर्वात मोठ्या एकदिवसीय रियल इस्टेट सल्लागार परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. ही परिषद सोमवार, ६ जुलै २०२६ रोजी सकाळी ९ ते रात्री ९ या वेळेत हॉटेल जेडब्ल्यू. मॅरिएट, पुणे येथे होणार आहे. देशातील ३८ शहरांतील दोन हजारांहून अधिक रियल्टर्स आणि ३०० हून अधिक विकसक सहभागी होणार आहेत, अशी माहिती 'प्रॉप'चे अध्यक्ष उदयन माने आणि 'प्रॉप कनेक्ट २०२६'चे संयोजक रमेश तोष्णीवाल यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या पत्रकार परिषदेला माजी अध्यक्ष दर्शन चावला, तनुज नगरानी (उपाध्यक्ष - बिल्डर रिलेशन्स अँड स्पॉन्सरशिप), नीरज सिंग (उपाध्यक्ष- टेक्नॉलॉजी अँड कम्युनिकेशन), मनीष दीडमिसे (सचिव), मुरली रमनी (खजिनदार), दिनेश राठी (संचालक - ट्रेनिंग अँड मेंबरशिप सर्कल), सारंग मद्रेवार (संचालक- स्पोर्ट्स अँड कल्चरल फंक्शन्स), महेश यादव (संचालक - प्रॉप ग्रोथ), रवींद्र यादव (संचालक - डिजिटल पीआर/मीडिया), विक्रम मलिक (संचालक - बिझनेस एक्स्चेंज अँड क्रॉस सेल) आणि प्रीत कोहली (संचालक - इव्हेंट्स, एंगेजमेंट अँड नेटवर्किंग) उपस्थित होते.

उदयन माने म्हणाले, 'रियल्टर्स - फ्युएलिंग द फ्युचर' या संकल्पनेवर आधारित या परिषदेत रियल इस्टेट क्षेत्रातील तज्ज्ञ, विकसक, धोरणकर्ते आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील मान्यवर एकत्र येणार




आहेत. नेटवर्किंग, ज्ञानविनिमय आणि व्यवसायवृद्धीसाठी हे व्यासपीठ महत्त्वाचे ठरणार आहे. प्रॉप कनेक्ट २०२६ हा रियल्टर समुदायाच्या कार्याचा गौरव करणारा आणि देशातील संघटित रियल इस्टेट क्षेत्राला एकत्र आणणारा उपक्रम आहे. पुण्याच्या भविष्यातील विकास, कृत्रिम बुद्धिमत्ता, ऑटोमेशन, उद्योजकता आणि व्यवसाय विस्तार यांसारख्या विषयांवर परिषदेमध्ये तज्ज्ञांचे मार्गदर्शन होणार आहे, असे त्यांनी नमूद केले.

रमेश तोष्णीवाल म्हणाले, "पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे आयुक्त डॉ. अभिजित चौधरी पुण्याच्या पुढील विकासाच्या दिशेबाबत व्याख्यान देणार आहेत. तसेच 'द पंचशील स्टोरी' या विशेष संवादामध्ये अतुल चोरडिया सहभागी होणार असून, 'स्टोरी ऑफ द टायटन्स' या सत्रात देशातील आघाडीचे विकसक रियल इस्टेट क्षेत्राच्या भविष्यासंदर्भात चर्चा करणार आहेत. पुण्यातील नामांकित बांधकाम व्यावसायिकही विविध चर्चासत्रांत सहभागी होणार आहेत."

दर्शन चावला यांनी सांगितले की, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि ऑटोमेशन या विषयावर वैभव सिसिंटी, तर सीए सार्थक आहुजा २०२७ मधील रियल इस्टेट बाजारपेठेचा आढावा सादर करणार आहेत. राजीव तलरेजा व्यवसाय विस्तारावर मार्गदर्शन करणार असून, विनोदी कलाकार विपुल गोयल यांच्या कार्यक्रमाने परिषदेची सांगता होईल. याशिवाय सीएसआर उपक्रम, भागीदारांचा गौरव आणि गाला डिनरचेही आयोजन करण्यात आले आहे.

तनुज नगरानी यांनी सांगितले की, रिअल्टर्स आणि विकसक यांच्यात अधिक प्रभावी समन्वय निर्माण करणे आणि उद्योगातील नव्या संधींबाबत मार्गदर्शन करणे हा परिषदेचा उद्देश आहे. ३०० हून अधिक विकसक आणि भागीदारांचा सहभाग हा संघटित रिअल्टर चळवळीला मिळालेल्या पाठिंब्याचे प्रतीक असल्याचे त्यांनी नमूद केले.

# पीएमपीच्या २०० बसमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविणार

पुणे (दै. संध्या)

> सीसीटीव्ही यंत्रणेमुळे बसमधील महिलांची छेडछाड, चोरी, चालक-वाहक आणि प्रवाशांमधील वाद तसेच इतर अनुचित प्रकारांची पडताळणी करणे शक्य होणार आहे. भविष्यात उर्वरित बसमध्येही ही यंत्रणा टप्प्याटप्प्याने बसविण्याचा विचार पीएमपी प्रशासनाकडून केला जात आहे. प्रवाशांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देत बसमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचे काम सुरू झाले आहे. पहिल्या टप्प्यातील २०० बसमध्ये पुढील सात दिवसांत ही यंत्रणा कार्यान्वित करण्यात येईल.
>
> - महेश आव्हाड, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, पीएमपीएमएल

पुणे महानगर परिवहन महामंडळाने (पीएमपीएमएल) प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी बसमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचा निर्णय घेतला आहे. पहिल्या टप्प्यात पीएमपीच्या मालकीच्या २०० बसमध्ये प्रत्येकी दोन, असे एकूण ४०० सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येणार आहेत. महिला सुरक्षेला प्राधान्य तसेच वादाचे प्रसंग घडल्यास कारवाईच्या दृष्टीने सीसीटीव्ही यंत्रणा उपयुक्त ठरणार आहे.

शहरातील वाढती प्रवासी संख्या, बसमधील गर्दी, मोबाईल व पाकीटचोरीच्या घटना तसेच महिला प्रवाशांच्या सुरक्षेचा मुद्दा लक्षात घेऊन पीएमपीएमएलतर्फे हा निर्णय घेण्यात आला आहे. बसच्या पुढील आणि मागील भागात प्रत्येकी एक कॅमेरा बसविण्यात येणार असल्याने बसमधील संपूर्ण हालचालींची नोंद होणार आहे. या चित्रीकरणामुळे संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवणे, तक्रारींची पडताळणी करणे आणि गुन्ह्यांचा तपास करणे अधिक सोपे होईल.

सध्या पीएमपीच्या मालकीच्या ६८४ बस असून, त्यापैकी २०० बसमध्ये पहिल्या टप्प्यात सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित केली जाणार आहे. कॅमेऱ्यांमधील चित्रीकरणाचा डेटा १५ दिवस जतन केला जाणार असून, त्यानंतर तो स्वतंत्र हार्ड डिस्कमध्ये संग्रहित केला जाईल. आवश्यकतेनुसार हा डेटा पोलिस तपास किंवा अंतर्गत चौकशीसाठी उपलब्ध करून देता येणार आहे.

पीएमपीच्या ताफ्यात दररोज सुमारे १,७७० बस प्रवाशांच्या सेवेत धावत असून, जवळपास १२ लाख नागरिक सार्वजनिक बससेवेचा वापर करतात. पहिल्या टप्प्यात सीसीटीव्ही बसविण्यात येणाऱ्या २०० बसमधून दररोज अंदाजे एक लाख प्रवासी प्रवास करतात. त्यामुळे मोठ्या संख्येने प्रवाशांना अधिक सुरक्षित प्रवासाची सुविधा मिळणार आहे.

## विना लेबल व भेसळीच्या संशयावरून तुप व नमकीन या अन्न पदार्थाचा साठा जप्त

पुणे (दै. संध्या)

अन्न सुरक्षा आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यात 'सेफ फुड, सेफ ड्रग, सेफ महाराष्ट्र' राबविण्यात येत आहे. अन्न व औषध प्रशासन पुणे विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विशेष मोहिमेअंतर्गत मे. देवांश मिल्क अॅन्ड मिल्क प्रॉडक्टस, स नं. 21/1/3, शिव पार्वती अंगण, भालेकर नगर, पिंपळे गुरव, पुणे या आस्थापनेची तपासणीवेळी 230 कि.ग्रॅ. रुपये 90 हजार 500 किंमतीचा साठा विना लेबल व भेसळीच्या संशयावरुन जप्त करण्यात आला. तपासणीदरम्यान आढळून आलेल्या त्रुटींची गंभीर दखल घेत ग्राहकांच्या आरोग्याच्या संरक्षणाच्या दृष्टीने संबंधित आस्थापनेचा अन्न परवाना निलंबित करण्यात आला आहे.

अन्न सुरक्षा अधिकारी श्रीमती. शि. ग. घाटोळ यांनी श्री. सा. सु. पटवर्धन, श्री. अक्षय शेळके यांच्या पथकाने श्री. विश्वजीत शिंदे, सहायक आयुक्त (अन्न) यांच्या मार्गदर्शनाखाली केली.

पुणे विभागातील सोलापुर कार्यलयाकडून मे. संगीता फूड प्रॉडक्टस, मड्डे वस्ती, सोलापुर या आस्थापनेची सखोल तपासणी करुन नमकीन या अन्न पदार्थाचा 160 कि.ग्रॅ, किंमत रु. 32 हजार किंमतीचा साठा लेबलमधील त्रुटी व भेसळीच्या संशयावरुन जप्त करण्यात आला.

## शहरातील माणसे, टोलेजंग इमारती आणि मोठाल्या गाड्यांची भीती वाटते - नाना पाटेकर

पुणे (दै. संध्या)

निसर्गाच्या सान्निध्यात राहत असल्यामुळे आता मला शहरातील माणसे, टोलेजंग इमारती आणि मोठाल्या गाड्यांची भीती वाटू लागली आहे. या रखरखत्या भोवतालाने आपल्यातील हळवेपण हिरावून घेतले असल्याची जाणीव वेदना देणारी आहे, असे मत ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांनी व्यक्त केले.

विदिशा विचार मंच आणि कोहिनूर कट्टा यांच्या वतीने कोहिनूर ग्रुपच्या सहकार्याने ज्येष्ठ लेखक अनंत सामंत लिखित आणि रोहन प्रकाशनातर्फे प्रकाशित 'ही चंद्रचुऱ्याची नक्षी' या पुस्तकाचा प्रकाशन सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमाची निर्मिती आणि संकल्पना विदिशा विचार मंचचे समन्वयक पंकज क्षेमकल्याणी यांची होती.



कर्वे रस्त्यावरील स्वा. सावरकर अध्यासन केंद्रात आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमप्रसंगी व्यासपीठावर कोहिनूर ग्रुपचे चेअरमन कृष्णकुमार गोयल, प्रसिद्ध कवी संदीप खरे, प्रसिद्ध अभिनेत्री नेहा जोशी, विदिशा विचार मंचच्या संस्थापक-संचालक ममता क्षेमकल्याणी उपस्थित होते.


नाना पाटेकर म्हणाले की, अनंत सामंत हे वाचकाला झपाटून टाकणारे लेखक आहेत. त्यांच्या लेखनात दिसणारी निसर्गाची रूपे आपल्या कल्पनाशक्तीच्याही पलीकडची आहेत.

अनंत सामंत यांनी 'ही चंद्रचुऱ्याची नक्षी' या पुस्तकात अनेक वैयक्तिक अनुभव लिहिले आहेत. ही त्यांच्या लेखनाची जमेची बाजू असून त्यांनी कायम लिहिते राहिले पाहिजे.

## ZEE5 वर 'सतलज' या आणखी एका धाडसी आणि आशयघन कथेची मेजवानी

पुणे (दै. संध्या)

धाडसी, समकालीन आणि विचार करायला लावणाऱ्या कथांसाठीचे प्रभावी व्यासपीठ म्हणून ZEE5 ने आपली ओळख अधिक दृढ केली असून, या प्रवासातील पुढचे पाऊल म्हणून आज 'सतलज' या भावस्पर्शी चित्रपटाचा प्रीमियर करण्यात आला आहे. सत्यघटनांपासून प्रेरित असलेला हा चित्रपट केवळ मनोरंजनापुरता मर्यादित न राहता धैर्य, हानी आणि न्यायासाठीच्या अथक संघर्षाची कथा मांडतो. हनी त्रेहान यांनी दिग्दर्शित केलेल्या या चित्रपटाची निर्मिती आरएसव्हीपी आणि मॅकगफिन पिक्चर्स यांनी केली आहे. दिलजीत दोसांझ यांच्यासोबत अर्जुन रामपाल, कंवलजीत सिंह, सुविंदर विक्की आणि गीतिका विद्या ओहल्यान यांच्या महत्त्वाच्या भूमिका असून




हा चित्रपट आता केवळ हिंदी ZEE5 वर स्ट्रीम होत आहे.

मानवाधिकार कार्यकर्ते जसवंत सिंह यांच्या जीवनावर प्रेरित असलेली 'सतलज' ही भीती, सत्तेचा दबाव आणि मौन यांच्या छायेत सत्याचा अखंड शोध घेणाऱ्या एका व्यक्तीची निर्भीड कथा आहे. संघर्ष आणि अस्थिरतेच्या काळातील पार्श्वभूमीवर घडणारा हा चित्रपट गूढरीत्या बेपत्ता झालेल्या हजारो लोकांचे भयावह वास्तव आणि न्यायाच्या शोधात भटकणाऱ्या त्यांच्या कुटुंबांनी सोसलेली अमानुष वेदना उलगडतो. सत्य दडपण्याचा प्रयत्न करणाऱ्या व्यवस्थेला आव्हान देणारी कृती हेच सर्वांत मोठे धाडस असते, याची प्रभावी जाणीव करून देणारी ही कथा आहे.

आजचे प्रेक्षक निर्भीड, वास्तववादी आणि मनाला भिडणाऱ्या कथांना अधिक पसंती देत असताना हिंदी ZEE5 अशा कथा सातत्याने प्रेक्षकांसमोर आणत आहे, ज्या विचार करायला भाग पाडतात, अर्थपूर्ण संवादाला चालना देतात आणि दीर्घकालीन सांस्कृतिक प्रभाव निर्माण करतात. 'सतलज' हा त्या वचनबद्धतेचाच प्रत्यय देणारा चित्रपट आहे. धाडसी कथनशैली, सत्याशी तडजोड न करणारी मांडणी आणि दुर्लक्ष करता येणार नाही असा प्रभाव ही त्याची वैशिष्ट्ये आहेत.

# सिंधी समाजाला एकत्र आणण्यासाठी 'विश्व सिंधी सेवा संगम'चा पुढाकार

## बॉबी कर्नानी यांची पत्रकार परिषदेत माहिती; एक ऑगस्टला भव्य सोहळ्याचे आयोजन

पुणे (दै. संध्या)

पुण्यातील सुमारे ४५ हजार सिंधी बांधवांना एका संघटित व्यासपीठावर आणण्याच्या उद्देशाने 'विश्व सिंधी सेवा संगम (युनायटेड)' या संस्थेने पुढाकार घेतला आहे. शहरभर विभागनिहाय गट आणि मध्यवर्ती कोअर कमिटी स्थापन करून सिंधी समाजाची एकजूट वाढवण्यासह सांस्कृतिक वारशाचे जतन, शिक्षण, सामाजिक कार्य आणि उद्योजकतेला चालना देण्यासाठी संस्था प्रयत्नशील राहणार आहे. या संस्थेचे उद्घाटन एक ऑगस्टला होणार आहे, अशी माहिती संस्थेच्या महाराष्ट्र प्रदेश अध्यक्षा बॉबी कर्नानी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या पत्रकार परिषदेला प्रकाश कर्नानी, हिमांशू अजवानी, डॉ. डिंपल अजवानी, शाम ठाकूर, कुणाल हेमराजानी, हितेश सुगनानी, अमित मिरपुरी, सतीश अथवानी, करिश्मा अथवानी, सरिता पुरसवानी, राशि नछनानी, जय केसवानी, ईशिता मोटियानी, ऐश्वर्या घाटगे-गुरनानी, सिद्धार्थ शाम थडानी, श्रीदा रहेजा आणि हरीश डोडेजा उपस्थित होते.

बॉबी कर्नानी यांनी सांगितले की, पुण्यात सिंधी समाजाची लोकसंख्या मोठी असली, तरी विविध संस्थांमध्ये केवळ मर्यादित सदस्य सक्रिय असतात. या विखुरलेल्या समाजाला एका व्यासपीठावर आणले, तर शासनाकडील विविध योजना, अनुदाने आणि समाजोपयोगी उपक्रम अधिक प्रभावीपणे राबविता येतील. तसेच सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक स्तरावरही मोठ्या प्रमाणात काम करता येईल. या उपक्रमांतर्गत शहरातील प्रत्येक




भागात स्थानिक समित्या स्थापन करण्यात येणार असून, त्याद्वारे आपापल्या परिसरातील सिंधी कुटुंबांशी संपर्क ठेवला जाईल. या सर्व समित्यांचे समन्वय आणि शहरव्यापी उपक्रमांचे नियोजन करण्यासाठी मध्यवर्ती कोअर कमिटी कार्यरत राहणार आहे.

संस्थेतर्फे चेटीचंड, लाल लोई, सिंधी भाषा दिन, सिंधी संमेलन यांसारख्या सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असून, सिंधी भाषा व परंपरा जतन करण्यावर विशेष भर दिला जाणार आहे. याशिवाय दरवर्षी कुटुंबांना एकत्र आणण्यासाठी शहराबाहेरील विशेष सहलीचे आयोजनही करण्यात येणार आहे. शैक्षणिक क्षेत्रात विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, शैक्षणिक मदत, मार्गदर्शन, स्पर्धा परीक्षा व नागरी सेवांमध्ये करिअर करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी विशेष मार्गदर्शन कार्यक्रम राबविण्यात येणार आहेत. आर्थिकदृष्ट्या दुर्बल सिंधी मुलींच्या विवाहासाठी मदत तसेच गरजू कुटुंबांना सहाय्य करण्याचाही संस्थेचा मानस आहे, असे डॉ. हिमांशू अजवानी यांनी नमूद केले.

उद्योजकतेला प्रोत्साहन देण्यासाठी सिंधी उद्योजक आणि व्यावसायिकांची माहिती असलेली बिझनेस डिरेक्टरी तयार करण्यात येणार आहे. तसेच उद्योजकांमध्ये परस्पर सहकार्य वाढविण्यासाठी नेटवर्किंग कार्यक्रम आयोजित केले जाणार असून, समाजोपयोगी व सांस्कृतिक उपक्रमांसाठी प्रायोजकत्व आणि निधी संकलनावरही भर दिला जाणार आहे. पुण्यातील सर्व सिंधी कुटुंबांनी या उपक्रमात सहभागी व्हावे, विभाग समन्वयक म्हणून पुढाकार घ्यावा, युवकांना मार्गदर्शन करावे आणि समाजाच्या संघटन कार्यात योगदान द्यावे, असे आवाहन आयोजकांनी केले. लवकरच परिचय मेळावा आयोजित करून मध्यवर्ती कोअर कमिटीची स्थापना, विभागाध्यक्षांची नियुक्ती आणि वर्षभराच्या उपक्रमांचे नियोजन करण्यात येणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.

## थोडक्यात पण महत्वाचे...




### 23 गावांतील नागरिकांना महापालिकेचा इशारा; प्लॉट खरेदीपूर्वी कागदपत्र तपासा

पुणे (दैनिक संध्या) : महापालिकेत समाविष्ट झालेल्या २३ गावांमधील नागरिकांनी कोणताही भूखंड किंवा सदनिका खरेदी करण्यापूर्वी संबंधित जागेची बांधकाम परवानगी, मंजूर ले-आऊट, विकास आराखडा आणि अन्य कायदेशीर कागदपत्रांची खातरजमा करून प्लॉट, सदनिका खरेदी करण्याचे आवाहन महापालिकेचे शहर अभियंता अनिरुद्ध पावसकर यांनी केले आहे. महापालिकेत समाविष्ट गावांमध्ये मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकामे सुरू आहेत. त्यावर महापालिकेकडून कारवाईचा हातोडा उगारला जात आहे. मात्र, अनेकदा नागरिकांनी अनधिकृत सदनिका घेतल्यानंतर त्यावर कारवाई होण्याचे प्रकार घडत आहे. त्यामुळे नागरिकांनी कोणतीही मालमत्ता खरेदी करण्यापूर्वी संबंधित प्रकल्पास सर्व आवश्यक मंजुरी आहे का, याची खात्री करूनच व्यवहार करण्याचे आवाहन महापालिकेने केले आहे. अनधिकृत प्लॉटिंगमधील भूखंड किंवा बेकायदा बांधकामांतील सदनिका खरेदी केल्यास भविष्यात बांधकाम परवानगी, पाणीपुरवठा, जलनिस्सारण, रस्ते, वीज आणि इतर नागरी सुविधा मिळविताना अडचणी निर्माण होऊ शकतात. तसेच अशा व्यवहारांमुळे कायदेशीर वाद उद्भवण्याची शक्यताही आहे. नागरिकांनी अनधिकृत प्लॉटिंग किंवा बेकायदा बांधकामांची माहिती तातडीने महापालिकेला द्यावी. अशा प्रकारांवर कठोर कारवाई करण्याचा इशाराही शहर अभियंता पावसकर यांनी दिला आहे.



### वारकऱ्यांसोबत पंगतीत बसून उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी घेतला महाप्रसाद

पंढरपूर (दैनिक संध्या) : राज्याच्या उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रावहिनी अजितदादा पवार यांनी आज पंढरपूर दौऱ्यादरम्यान आषाढी वारीच्या तयारीचा आढावा घेतला. यावेळी नवीन भक्त निवास इमारतीच्या उद्‌घाटन कार्यक्रमासही त्या उपस्थित होत्या. भक्तनिवास परिसरात आयोजित वारकऱ्यांच्या भक्ती पंगतीमध्ये वारकऱ्यांनी केलेल्या आग्रहाचा मान राखत सुनेत्रावहिनींनी त्यांच्यासोबत पंगतीत बसून महाप्रसादाचा लाभ घेतला. त्यांच्या या साधेपणाच्या आणि वारकरी परंपरेप्रती असलेल्या आदराच्या भावनेचे उपस्थित वारकऱ्यांनी स्वागत केले.

## सखोल पुर्नरिक्षण मोहिमेत प्रत्येक मतदारापर्यंत पोहोचणे आवश्यक

# समन्वयातून आणि सहकार्यातून काम करावे - जिल्हाधिकारी

**भिवंडी (दै. संध्या) :**

सखोल पुर्नरिक्षण मोहिमेत प्रत्येक मतदारापर्यंत पोहोचणे आवश्यक -समन्वयातून आणि सहकार्यातून काम करावे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ यांनी आज केले. कल्याण पश्चिमेतील आचार्य अत्रे रंगमंदिरात मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधी (BLA) यांचेसोबत विशेष सखोल पुर्नरिक्षण (एस.आय.आर.) मोहिमेसंदर्भात आयोजिलेल्या बैठकीमध्ये उपस्थितांना संबोधिताना त्यांनी हे प्रतिपादन केले, यावेळी महापालिका आयुक्त अभिनव गोयल, अतिरिक्त आयुक्त योगेश गोडसे,प्रांत अधिकारी सर्जेराव मस्के पाटील, उपजिल्हाधिकारी वरुण सहारे ,उपआयुक्त रामदास कोकरे, तहसीलदार विकास गारुडकर आणि कल्याण डोंबिवली परिक्षेत्रातील चारही मतदार संघाचे (138, 142, 143 व 144) मतदार नोंदणी अधिकारी उपस्थित होते.

निवडणूक आयोगाने मतदार याद्या पुर्नरिक्षणाचा कार्यक्रम हाती घेतला असून, याच अनुषंगाने या मोहिमेसाठी आवश्यक असणारे मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधी (BLA- राजकीय पक्षाचे प्रतिनिधी) नेमण्यासाठी गतआठवड्यात जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक घेण्यात आली होती. या बैठकीच्या अनुषंगाने महापालिका क्षेत्रातील मतदार संघात नेमण्यात आलेल्या मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधी (BLA) यांना आज जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ व महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी या मोहिमेचे महत्व विषद करीत स्वत: मार्गदर्शन केले.



निवडणूक आयोगाची ही महत्वाची मोहिम असून, प्रत्येक मतदाराने मतदार यादीत आपले नाव सुयोग्यरित्या समाविष्ट होईल याची खातरजमा करावी, असे आवाहन महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी या बैठकीत केले.

या बैठकीनंतर जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ, आयुक्त अभिनव गोयल, अतिरिक्त आयुक्त योगेश गोडसे यांनी प्रत्यक्ष मतदारांच्या घरी जावून मतदारांकडून Enumeration Form (गणना प्रपत्र) भरुन घेतला. जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ व महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी विशेष सखोल पुर्नरिक्षण (एस. आय.आर.) मोहिमेत समक्ष सहभाग घेवून, निवडणूक आयोगाच्या या मोहिमेचे महत्व जनमानसात अधोरेखित केले आहे.

## उद्योजकांचे विक्री व ब्रँडिंग प्रचारासाठी प्रदर्शनाची गरज- महापौर ज्योतीताई गाडे

**अहिल्यानगर (दै. संध्या) :**

प्रदर्शन हे फक्त बाजारपेठ नाही. ही आपल्या मातीतले कष्टकरी हातांना आधार देणारी चळवळ आहे. ही स्वदेशी वस्तुंना प्रोत्साहन देणारी व उद्योजक महिला, बचत गट, शेतकरी आणि तरुणांसाठी नवीन दिशा आहे. आवडीच्या वस्तू, गुणवत्ता आणि रास्त दर आता एकाच छताखाली उपलब्ध करण्यात आले आहे.

या प्रदर्शन व विक्री मेळाव्यातून महिलांना स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध झाली आहे. तसेच महिला उद्योजकांसाठी एक व्यासपीठ निर्माण झाले आहे.महिला उद्योजक व छोटे उद्योजकांचे विक्री व ब्रँडिंग व प्रचारासाठी प्रदर्शनाची गरज आहे. असे प्रतिपादन महापौर ज्योतीताई गाडे यांनी केले आहे. अमृत व प्रतिबिंब संस्था अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने शमी गणपती हॉल,दिल्लीगेट येथे प्रदर्शन व विक्री मेळाव्याचे उद्‌घाटन महापौर ज्योतीताई गाडे यांच्या हस्ते फित कापून करण्यात आले. या प्रसंगी उपमहापौर धनंजय जाधव, संजय चोपडा, नरेंद्र कुलकर्णी, विनायक देशमुख, सागर भोपे, संयोजिका अनुजा कांबळे, वनिता मानकर, जयश्री सूळ,ऋतुजा धोत्रे, प्रिया भागवत आदिंसह महिला उद्योजक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उप महापौर धनंजय जाधव म्हणाले या प्रदर्शन व मेळाव्यातून महिलांना एक व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले आहे. तसेच महिलांना उद्योग व्यवसायासाठी चांगली संधी निर्माण झाली आहे. नगरकरांनी या प्रदर्शनाला भेट द्यावी.

## वडगाव निंबाळकर पोलीस स्टेशन हद्दीत विशेष वाहतूक अंमलबजावणी मोहीम

**वडगाव निं. (दै. संध्या) :**

वडगाव निंबाळकर पोलीस स्टेशन हद्दीत वाहतूक नियमांचे काटेकोर पालन व्हावे,अपघातांचे प्रमाण कमी व्हावे तसेच नागरिकांमध्ये वाहतूक नियमांविषयी जनजागृती निर्माण व्हावी या उद्देशाने विशेष वाहतूक अंमलबजावणी मोहीम राबविण्यात आली.

या मोहिमेदरम्यान मोटार वाहन कायद्याअंतर्गत खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आली: रंगीत (ब्लॅक फिल्म) काचा असलेली वाहने – 18 केसेस, ₹19,500 दंड.; फॅन्सी/कलर नंबर प्लेट अथवा नंबर प्लेट नसलेली वाहने – 10 केसेस, ₹7,000 दंड. दुचाकीवर ट्रिपल सीट प्रवास – 8 केसेस, ₹8,000 दंड.; वैध वाहन चालविण्याचा परवाना (Driving Licence) नसणे – 4 केसेस, ₹20,000 दंड.; विना हेल्मेट



दुचाकी चालविणे – 6 केसेस, ₹6,000 दंड.; मालवाहू वाहनांवर आवश्यक रेड रिफ्लेक्टर नसणे – 12 केसेस, ₹12,000 दंड.; बुलेट मोटारसायकलमध्ये मॉडिफाईड (फटाका) सायलेन्सर बसविणे – 6 केसेस, ₹6,000 दंड.; इतर वाहतूक नियमांचे उल्लंघन – 20 केसेस, ₹15,000 दंड. एकूण कारवाई : 84 केसेस; एकूण दंड : ₹93,500/-.

सर्व वाहनचालकांनी वाहतूक नियमांचे काटेकोरपणे पालन करावे, हेल्मेट व सीटबेल्टचा वापर करावा, वाहनावर नियमबाह्य बदल करू नयेत तसेच वैध कागदपत्रे बाळगावीत.नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध यापुढेही लहान मुलांना वाहन देणे अवजड वाहने यांच्यावरती कठोर कारवाई करण्यात येणार आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक श्री. संदीप गिल्ल, पुणे ग्रामीण, अप्पर पोलीस अधीक्षक श्री. गणेश बिराजदार, बारामती विभाग तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. चैतन्य कदम, बारामती उपविभाग यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभारी पोलीस निरीक्षक श्री. जीवन मोहिते यांच्या नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक श्री. राहुल साबळे, पोलीस हवालदार नाळे, पोलीस हवालदार खेडकर, पोलीस हवालदार देवकर तसेच पोलीस कॉन्स्टेबल जाधव, धोत्रे, भोसले, यादव व सोनवणे यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

## उपाशी गरजूंची भूक भागविणाऱ्या 'स्पर्श ममतेचा' अन्नदान उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन

**पुणे (दै. संध्या) :**

समाजातील उपाशी, वंचित आणि गरजू व्यक्तींची भूक भागविण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या 'स्पर्श ममतेचा' या अनोख्या अन्नदान उपक्रमात महिला वर्गाने सहभागी होण्याचे आवाहन सामाजिक कार्यकर्त्या सोनू जोशी यांनी केले आहे. या उपक्रमांतर्गत दर शुक्रवारी आपल्या घरचे प्रेमाने बनवलेले ताजे जेवण खऱ्या अर्थाने गरजू आणि अन्नाची गरज असलेल्या व्यक्तीपर्यंत पोहोच करणे हा उद्देश आहे.

हा केवळ अन्नदानाचा उपक्रम नसून, त्यामागे माणुसकी, प्रेम आणि आपुलकीचा स्पर्श देण्याचा उद्देश आहे. या उपक्रमाची संकल्पना सोनू जोशी यांची आहे. या उपक्रमासाठी चेतना बडवे, रेखा कांबळे, अमृता सुर्वे, मनीषा समर्थ, पूनम महेंद्रकर, राखी येवले, रुपाली धनावडे यांचे सहकार्य मिळाले आहे. याबाबत सोनू जोशी यांनी सांगितले, की या



उपक्रमाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे, 'स्पर्श ममतेचा – भाग 2' मध्ये ज्या महिला नियमितपणे आणि सर्व नियमांचे पालन करून सहभाग घेतील, त्यांचे विशेष कौतुक करण्यात येईल. घरच्या जेवणाच्या एका घासाने एखाद्या उपाशी व्यक्तीच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य फुलवण्याचा हा छोटासा प्रयत्न समाजात नक्कीच एक नवा आदर्श निर्माण करेल. "माणुसकीचा स्पर्श देऊया आणि या सुंदर प्रवासाचाही भाग बनूया," असे आवाहनही सोनू जोशी यांनी केले आहे.

## पक्षांतरावर न्यायालयाचे ताशेरे

लोकशाही ही मतदारांच्या विश्वासावर उभी असते. मतदार एखाद्या उमेदवाराला केवळ त्याच्या व्यक्तिमत्त्वासाठी नव्हे, तर त्याने स्वीकारलेल्या विचारसरणी, पक्ष आणि जाहीरनाम्यावर विश्वास ठेवून निवडून देतात. परंतु निवडून आल्यानंतर सत्तेचे आकर्षण, मंत्रिपदाची लालसा किंवा वैयक्तिक स्वार्थासाठी आमदार-खासदारांकडून होणारे पक्षांतर हे लोकशाहीच्या पायावरच घाव घालणारे आहे.

अलीकडेच न्यायालयाने पक्षांतराच्या प्रवृत्तीवर अत्यंत परखड शब्दांत ताशेरे ओढत, "तुम्हीही पक्षांतर करा", अशी उपरोधिक टिप्पणी केली. "सत्ताधारी पक्षात एक प्रकारचे 'वॉशिंग मशीन' आहे; तिथे गेल्यावर गुन्हे आणि पापे धुतली जातात," अशी न्यायालयाची टिप्पणी ही केवळ मिश्कील नसून, आजच्या राजकीय वास्तवावर मारलेला अत्यंत तीक्ष्ण उपरोध आहे. अशा प्रकारची टिप्पणी न्यायालयाला करावी लागते, ही आपल्या राजकीय व्यवस्थेसाठी लाजिरवाणी बाब आहे.

पक्षांतरबंदी कायदा अस्तित्वात असूनही त्यातील त्रुटींचा आधार घेत अनेक लोकप्रतिनिधी जनादेशाशी प्रतारणा करतात. निवडणुकीत एका पक्षाच्या नावावर मते मागायची आणि नंतर सत्तेच्या मोहापोटी दुसऱ्या पक्षात प्रवेश करायचा, हा मतदारांच्या विश्वासघाताचा प्रकार आहे. त्यामुळे लोकशाहीवरील जनतेचा विश्वास डळमळीत होत आहे.

सत्ता बदलली की चौकशी थांबते, आरोप मागे पडतात किंवा राजकीय संरक्षण मिळते, अशी समाजात निर्माण झालेली धारणा लोकशाहीसाठी धोकादायक आहे. कायदा सर्वांसाठी समान असला पाहिजे. न्यायव्यवस्थेच्या अशा निरीक्षणांमधून राजकीय नैतिकतेचा झालेला ऱ्हास स्पष्टपणे अधोरेखित होतो.

पक्षांतरबंदी कायदा अधिक कठोर करण्याची, पक्षांतर करणाऱ्या लोकप्रतिनिधींचे सदस्यत्व तत्काळ रद्द करण्याची आणि पुन्हा जनतेचा कौल घेणे बंधनकारक करण्याची वेळ आता आली आहे. अन्यथा मतदारांचा जनादेश हा केवळ सत्तेच्या राजकारणातील व्यवहार ठरेल.

न्यायालयाचे ताशेरे हे केवळ एखाद्या व्यक्तीवर नव्हे, तर संपूर्ण राजकीय व्यवस्थेवर केलेले भाष्य आहे. या इशाऱ्यातून राजकीय पक्षांनी आणि लोकप्रतिनिधींनी आत्मपरीक्षण करून लोकशाही मूल्ये, नैतिकता आणि जनतेचा विश्वास जपण्याची जबाबदारी स्वीकारली पाहिजे. अन्यथा लोकशाहीची प्रतिष्ठा आणि जनतेचा विश्वास दोन्हीही धोक्यात येण्यास वेळ लागणार नाही.

- सुनील सुंदराबाई धाऊ झळके
वृत्तपत्र लेखक भिवंडी (ठाणे)

## एमआयडीसीतील कंपन्यांना बेकायदेशीरपणे त्रास दिल्यास गुन्हे दाखल होणार

**शिक्रापूर (दै. संध्या) :**

शिक्रापूर पोलीस स्टेशनच्या वतीने शुक्रवारी (दि.३) रोजी शिक्रापूर एमआयडीसीतील विविध कंपन्यांचे एचआर मॅनेजर व प्रतिनिधी यांची समन्वय बैठक घेण्यात आली. उद्योगांना सुरक्षित, भयमुक्त आणि कायद्याचे संरक्षण असलेले वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी पोलीस प्रशासन कटिबद्ध असल्याचा संदेश यावेळी देण्यात आला. बैठकीत कंपन्यांना भेडसावणाऱ्या विविध अडचणी, सुरक्षा व्यवस्था आणि कायदा-सुव्यवस्थेबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. औद्योगिक वसाहतीमध्ये लेबर, स्क्रॅप, ट्रान्सपोर्ट, केटरिंग, सिक्युरिटी, हाऊसकिपिंग, पाणी टँकर किंवा इतर कोणत्याही कामांचे ठेके मिळवून देण्याच्या नावाखाली कोणीही व्यक्ती अथवा संघटना बेकायदेशीर दबाव टाकत असेल, पैसे किंवा खंडणीची मागणी करत असेल, दमदाटी अथवा धमक्या देत असेल, तर त्याची तात्काळ माहिती पोलिसांना द्यावी, असे आवाहन करण्यात आले. अशा प्रकारच्या तक्रारींमध्ये संबंधितांविरुद्ध तातडीने गुन्हे दाखल करून कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल, असा स्पष्ट इशारा शिक्रापूर पोलिसांनी दिला.

यावेळी एमआयडीसी परिसरातील चोऱ्या रोखण्यासाठी प्रभावी उपाययोजना, कंपनी परिसरात नियमित पोलीस पेट्रोलिंग वाढविणे, वाहतूक कोंडी व अपघात टाळण्यासाठी नियोजन, कामगारांची लुटमार रोखण्यासाठी विशेष लक्ष देणे, तसेच परप्रांतीय कामगारांची संपूर्ण माहिती व नोंदी कंपन्यांनी अद्ययावत ठेवाव्यात, याबाबतही सविस्तर चर्चा झाली. उद्योग-व्यवसाय सुरळीत आणि सुरक्षितपणे सुरू राहण्यासाठी शिक्रापूर पोलीस स्टेशनकडून २४ तास आवश्यक ते सहकार्य व संरक्षण दिले जाईल, अशी ग्वाही बैठकीत देण्यात आली. तसेच कोणतीही संशयास्पद घटना अथवा बेकायदेशीर प्रकार निदर्शनास येताच विलंब न करता पोलीस प्रशासनाशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले. बैठकीतील या भूमिकेचे उपस्थित कंपनी प्रतिनिधींनी स्वागत करत पोलीस प्रशासनाचे आभार मानले. उद्योग आणि पोलीस प्रशासन यांच्यातील समन्वय अधिक मजबूत करण्यासाठी अशा बैठका नियमितपणे आयोजित करण्याची अपेक्षाही यावेळी व्यक्त करण्यात आली.

यावेळी क्रोम वेल इंजीनियरिंग चे नीलेश गव्हाणे, संदीप दिवेकर जॉन डीअर चे राम अहिरे, अलिकॉन च्या श्रीमती जाधव, हर्ष ओगल चे मारुती पाटील, मॅक अल्टी चे असलम परवेज व इतर यांनी आपल्या समस्या मांडल्या.

यावेळी पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांच्यासोबत सहाय्यक पोलीस निरीक्षक शिवाजी भोसले हनुमंत गिरी उपनिरीक्षक तुषार भोर गोपनीय अंमलदार संदीप कारंडे बापू जगताप हे हजर होते.



# सोनालिका ट्रॅक्टर्सने पहिल्या तिमाहीत सर्वाधिक ५३,६६१ ट्रॅक्टर विक्रीची केली नोंद

**पुणे (दै. संध्या) :**

भारतातील क्रमांक एकचा ट्रॅक्टर निर्यात ब्रँड असलेल्या सोनालिका ट्रॅक्टर्सने विक्रमी कामगिरीसह आर्थिक वर्ष २०२७ च्या पहिल्या तिमाहीचा टप्पा पूर्ण केला असून केवळ ३ महिन्यांत ५० हजार ट्रॅक्टरची विक्री केली आहे. याद्वारे कंपनीने पहिल्या तिमाहीत आजवरच्या सर्वाधिक ५३,६६१ ट्रॅक्टर विक्रीची नोंद केली आहे. कंपनीने एकूण २३.१ टक्के एवढी अचंबित करणारी वाढ साध्य केली असून उद्योगाच्या कामगिरीला (अंदाजे १८.३ टक्के) मागे टाकले आहे. एप्रिल-जून २६ मध्ये देशांतर्गत बाजारपेठेतील सर्वाधिक वाटा मिळवत ती गौरवाने उभी आहे. या नव्या यशामुळे आपल्या नावीन्यपूर्ण ट्रॅक्टर तंत्रज्ञानासह 'जीतने का दम' देण्याच्या कंपनीच्या कायमस्वरूपी भावनेला, तसेच गेल्या ३ दशकांपासून




ब्रँडची प्रेरक शक्ती म्हणून कायम असलेल्या अपवादात्मक ग्राहक समाधानाची पुष्टी झाली आहे.

सोनालिकाच्या सातत्यपूर्ण वाढीतून अधिकतम मूल्याने जागतिक दर्जाचे तंत्रज्ञान भारतीय शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्याची सोनालिकाची कटिबद्धता अधोरेखित होते. नव्याने सुरू झालेल्या सोनालिका गोल्ड ट्रॅक्टर सीरिजला चालू खरीप हंगामात शेतकऱ्यांकडून उत्साहवर्धक प्रतिसाद मिळत आहे. यामध्ये सर्वात मोठे ३ सिलिंडर ३,५३२ सीसी इंजिन आणि शेतकऱ्यांना नफा मिळावा, यासाठी डिझाईन केलेली इतर कामगिरीकेंद्रीत वैशिष्ट्ये आहेत. या वेगवान वाटचालीला शक्ती पुरविण्यासाठी सोनालिकाचा जगातील सर्वात मोठा एकात्मिक ट्रॅक्टर प्लांट आहे. त्याला जागतिक संशोधन आणि विकास क्षमता आणि प्रिसिजन इंजिनिअरिंगमधील सातत्यपूर्ण गुंतवणूकीचा आधार आहे. त्यातून एकत्रितपणे सोनालिकाला जगभरातील शेतकऱ्यांसाठी 'वन स्टॉप सोल्यूशन पार्टनर' म्हणून काम करण्याची शक्ती मिळते.

नवीन विक्रम प्रस्थापित करणाऱ्या या कामगिरीविषयी इंटरनॅशनल ट्रॅक्टर्स लिमिटेडचे संयुक्त व्यवस्थापकीय संचालक रमण मित्तल म्हणाले, 'आर्थिक वर्ष २०२७च्या अवघ्या ३ महिन्यांत ५०,००० ट्रॅक्टर विक्रीचा टप्पा पार केल्याचा आम्हाला अभिमान आहे.

आमच्या 'जीतने का दम'सह नवीन कामगिरीचे निकष निर्माण करण्यासाठी आम्ही पारंपारिक विचारसरणीच्या पद्धतींना सातत्याने आव्हान दिले आहे आणि आमच्या विश्वासार्ह आणि शक्तिशाली ट्रॅक्टरसह आम्ही शेतकऱ्यांचा विश्वास मजबूत केला आहे. भारतीय शेतीमध्ये जे शक्य आहे त्याचे मापदंड सतत उंचावणे आहेत आणि भारतीय अभियांत्रिकीला जागतिक स्तरावर पुढे नेणे, हे आमच्यासाठी सर्वांत महत्त्वाचे आहे.

आर्थिक वर्ष २०२७ ची दुसरी तिमाही सुरू होत असताना, शेतकऱ्यांच्या निरंतर वाढीसाठी कार्यक्षम आणि अखंडित कृषिकार्य सुनिश्चित करण्यासाठी आम्ही तयार आहोत."

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः गाव पाडळी, ता.जुन्नर, जि.पुणे येथील व आसपासचे सर्व लोकांस आमचे आशिल यांनी सांगितलेवरून जाहीर नोटीस देण्यात येते की,

गाव पाडळी, ता.जुन्नर जि.पुणे येथील जमीन ग.नं. २३ क्षेत्र ०० हे ५७.६७ आ, आकार ०० रु. ९८ पैसे यापैकी क्षेत्र ०० हे ११ आर, आकार ०० रु. ५१ पैसे यांसी चतुःसिमा - पुर्वेस - ग.नं. २३ पैकी श्री.विठोबा गव्हाणे यांचे हिश्याचे क्षेत्र, दक्षिणेस - रस्ता. पश्चिमेस अजित गव्हाणे यांचे क्षेत्र, उत्तरेस राजेंद्र बुट्टे यांचे क्षेत्र ही मिळकत श्री. विठोबा बाबुराव गव्हाणे यांचे मालकी ताबेवहिवाटीची मिळकत आहे. सदरहू मिळकतीचा खरेदी-विक्रीचा व्यवहार आमचे आशिलांनी श्री. विठोबा बाबुराव गव्हाणे करण्याचे ठरविलेले आहे. तसेच सदर मिळकत निर्वेध व निजोखमी असलेबाबत सदर मिळकतीवर कोणाचेही बक्षीसण, गहाण, दान, लिज, पोटगी, चोळी-बांगडी, खरेदी, साठेखत, करार-मदार, कुळ, वहिवाट, विसार पावती, वाटप, वारस हक्क, हद्दी संदर्भात वाद, चतुःसिमांबाबत वाद अगर तक्रार, अतिक्रमण तसेच हिंदु कायद्याप्रमाणे अथवा प्रचलीत प्रथेप्रमाणे अग्रहक्काचे अधिकार, विरूद्ध कब्जा इतर कोणत्याही स्वरूपाचे हक्क हितसंबंध नसल्याचा त्यांनी भरोसा दिलेला आहे. सदर मिळकतीबाबत कुणाचीही कोणत्याही स्वरूपाचे तक्रार किंवा हरकत असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे मुळ कागदपत्रांनिशी खात्री पटवून द्यावी. अन्यथा मिळकतीत कोणाचेही हक्क, हितसंबंधीत नाहीत व असल्यास त्यांनी खात्रीने जाणीवपुर्वक सोडून दिलेली आहे असे समजून सदरचा व्यवहार पुर्ण करण्यात येईल व नंतर कुणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घेण्यात यावी.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस
दि.०४/०३/२०२६

श्री. विश्वजीत गोपाळ वर्पे
ॲडव्होकेट

## थोडक्यात पण महत्वाचे...




### ‘समर्थ’ चित्रपटाच्या संगीताचा दिमाखदार सोहळा चिंचवडमध्ये संपन्न!

पिंपरी (दैनिक संध्या) : आजच्या स्पर्धात्मक आणि धावपळीच्या जीवनात समर्थ रामदास स्वामींचे विचार नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याच्या उद्देशाने साकारलेल्या आगामी ‘समर्थ’ या मराठी चित्रपटाच्या संगीताचा दिमाखदार अनावरण सोहळा नुकताच चिंचवड येथील रामकृष्ण मोरे सभागृहात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. भक्तिमय वातावरण, सुरेल गीतांची मैफल, कलाकारांचे मनोगत आणि चित्रपटाच्या निर्मितीमागचा प्रवास उलगडणाऱ्या दिलखुलास संवादांनी हा सोहळा संस्मरणीय ठरला. कार्यक्रमाची सुरुवात शंकर महादेवन यांच्या स्वरातील चित्रपटातील भव्य प्रार्थनेच्या विशेष दृश्य सादरीकरणाने झाली. त्यानंतर चित्रपटाच्या संगीताचे अधिकृत अनावरण करण्यात आले. अभिनेत्री स्वानंदी टिकेकर यांनी आपल्या ओघवत्या आणि खुमासदार शैलीत कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. या सोहळ्याला ज्येष्ठ अभिनेत्री सुप्रिया पिळगावकर प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. तसेच जयदीप वैद्य, अनिरुद्ध जोशी, आर्या आंबेकर, रोहित राऊत आणि जुईली जोगळेकर यांनी चित्रपटातील गीते सादर करत उपस्थित रसिकांना मंत्रमुग्ध केले. अभिनेत्री शर्वरी जमेनीस यांनी कथ्थक नृत्यशैलीत सादर केलेल्या विशेष नृत्याविष्काराने कार्यक्रमात रंगत आणली. समारोपावेळी शंकर महादेवन यांच्या प्रार्थनेवर शर्वरी जमेनीस यांच्या नृत्यसंस्थेतील विद्यार्थिनींनी सादर केलेल्या भव्य नृत्याविष्काराला उपस्थितांनी उत्स्फूर्त दाद दिली.

### पिंपरी-चिंचवडमधील डॉक्टर महिलेने इमारतीवरून उडी मारून संपवले जीवन

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी-चिंचवड शहरातील शहरातील थेरगाव येथील एका प्रतिष्ठित खासगी रुग्णालयात कार्यरत असलेल्या एका महिला डॉक्टरने इमारतीवरून उडी मारून आपले जीवन संपवल्याची धक्कादायक घटना आज सकाळी उघडकीस आली. डॉ. श्वेता रोकडे असे जीवन संपवेलल्या महिला डॉक्टरचे नाव आहे. या प्रकरणी रावेत पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक ऋषिकेश घाडगे यांनी दिलेल्या माहितीनुसार, डॉ. श्वेता रोकडे या रावेत येथील 'सेलेस्टीयल सिटी' सोसायटीमध्ये आपल्या इतर दोन मैत्रिणींसोबत भाड्याने फ्लॅट घेऊन राहत होत्या. थेरगाव येथील एका नामांकित खासगी रुग्णालयात त्या वैद्यकीय सेवा देत होत्या. त्यांनी आज सकाळी अचानक इमारतीवरून उडी मारून टोकाचे पाऊल उचलले. घटनेची माहिती मिळताच रावेत पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या डॉ. श्वेता यांना उपचारासाठी औंध येथील जिल्हा रुग्णालयात दाखल केले. मात्र, उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे तेथील डॉक्टरांनी घोषित केले.

### भोसरीत स्टॉर्म वॉटर चेंबरमध्ये दुचाकी अडकली; महिला व मुलाचा बचाव

भोसरी (दैनिक संध्या) : भोसरी परिसरात स्टॉर्म वॉटर लाईनच्या चेंबरमध्ये दुचाकीसह महिला व तीचा मुलगा फसल्याची धक्कादायक घटना शुक्रवारी घडली. सुदैवाने नागरिकांनी तातडीने धाव घेत महिलेला बाहेर काढल्याने मोठी दुर्घटना टळली. या घटनेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, वाहनचालकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. महापालिकेच्या नियोजनशून्य कारभारावर नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे. भोसरी, बापूजी बुवा चौक, महात्मा महात्मा फुले शाळेजवळील औद्योगिक वसाहत रस्त्यावर पावसाच्या पाण्याचा निचरा होण्यासाठी महापालिकेच्या ड्रेनेज विभागाकडून स्टॉर्म वॉटर लाईन व ड्रेनेज लाईन टाकण्यात आली आहे. या लाईनवर पाण्याचा निचरा होण्यासाठी ठिकठिकाणी छिद्र असलेले चेंबर बसविण्यात आले आहेत. परंतु, या चेंबरची दुरवस्था झाली आहे. याकडे महापालिकेचा संबंधित विभाग लक्ष देत नसल्याने व पावसाळापूर्व कामे पूर्ण झाल्याची बोंब ठोकणारे प्रशासन नागरिकांच्या जिवाशी खेळ खेळत असल्याने अशा घटना घडत आहेत. या ठिकाणी असलेले स्टॉर्म वॉटर लाईनच्या चेंबरमध्ये एका महिलेचे दुचाकी वाहन अडकले. पाण्याचा निचरा होण्यासाठी स्ट्रॉर्मवॉटर लाइन टाकली; परंतु चेंबर रस्त्यापेक्षा वर असल्याने पाण्याचा निचरा होत नाही. परिणामी पावसाचे पाणी साचून राहत असल्याने चेंबर नागरिकांच्या व वाहनचालकांच्या लक्षात येत नसल्याने दुचाकीचालक महिला व तीचा मुलगा या चेंबरमध्ये अडकून पडले. घटनास्थळी उपस्थित नागरिकांनी तत्परता दाखवत महिलेची सुखरूप सुटका केली. या घटनेत महिलेला किरकोळ दुखापत झाली.

# संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यासाठी जय्यत तयारी

## आकुर्डी मुक्काम व पालखी मार्गाची आयुक्तांकडून पाहणी; रस्ते दुरुस्ती, अतिक्रमण हटवणे आणि सुविधा व्यवस्थेचे तातडीने निर्देश

पिंपरी (दै. संध्या)

जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याचे बुधवार (दि. ८) पिंपरी-चिंचवड उद्योगनगरीत आगमन होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर महापालिकेकडून पालखी मार्ग आणि आकुर्डी येथील मुक्कामाच्या ठिकाणची तयारी करण्यात येत आहे. पालखी मार्ग व मुक्कामाच्या परिसराची पाहणी करून आयुक्तांनी संबंधित अधिकाऱ्यांना सूचना केल्या आहेत.

जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराज आषाढी पालखी सोहळ्याचे देहू गावातून मंगळवार (दि. ७) प्रस्थान होणार आहे. पालखीचे पिंपरी-चिंचवड शहरात निगडी येथील भक्ती-शक्ती समूह शिल्प चौक येथे बुधवारी सायंकाळी आमगन होणार आहे. तेथे महापालिकेकडून स्वागत केले जाते.

त्या दिवशी आकुर्डी येथील विठ्ठल-रुक्मिणी मंदिर येथे पालखीचा मुक्काम असतो. दुसऱ्या दिवशी गुरुवार (दि. ९) सकाळी पालखी आकुर्डी, चिंचवड, पिंपरी, खराळवाडी, संत तुकारामनगर, कासारवाडी, फुगेवाडी मार्गे दापोडी येथून पुणे शहरात प्रवेश करते.



पालखी मार्ग, मुक्काम ठिकाण तसेच, विविध विसावा ठिकाणांची आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी गुरुवार (दि. २) पाहणी केली. या वेळी अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, तृप्ती सांडभोर, विक्रांत बगाडे, सहशहर अभियंता बापूसाहेब गायकवाड, उपायुक्त अण्णा बोदडे, मुख्य उद्यान अधीक्षक महेश गारगोटे, क्षेत्रीय अधिकारी अतुल पाटील, निवेदिता घार्गे, कार्यकारी अभियंता विजय भोजने, उमेश मोने, शिवाजी चौरे, वैशाली ननावरे व अधिकारी उपस्थित होते.

### रस्त्यांची दुरुस्ती तातडीने करण्याच्या सूचना

पालखी मार्गावरील टपऱ्या, अतिक्रमण आणि रस्त्यांवर येणाऱ्या लहान व्यावसायिकांमुळे भाविकांना अडथळा निर्माण होऊ नये, याची खबरदारी घेण्याचे आदेश आयुक्तांनी अधिकाऱ्यांनी दिले. सर्व्हिस रस्त्यावर मेट्रो कामाचे लावलेले बॅरिकेड्स हटवण्यासोबतच प्रकाश व्यवस्था व वैद्यकीय सुविधा चोख ठेवावी. पावसाळ्याचा विचार करता चिखल होऊ नये, म्हणून तात्काळ खडी टाकण्याचे आणि शुद्ध पाणीपुरवठा करावा. मेट्रोच्या सुरू असलेल्या कामांमुळे पालखीला अडथळा होऊ नये. रस्त्यांची दुरुस्ती तातडीने करावी, झाडांच्या फांद्या छाटणे आदी कामे तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना आयुक्तांनी दिल्या आहेत.

## पिंपरी-चिंचवडमध्ये मतदार यादी पडताळणीला सुरुवात!

पिंपरी (दै. संध्या)



पिंपरी-चिंचवड शहरातील पिंपरी, चिंचवड व भोसरी विधानसभा मतदारसंघात मतदारांचे मतदार यादीतील नावे पडताळणीस मंगळवारी (दि. 30) सुरुवात करण्यात आली. घरोघरी जाऊन त्यांना अर्जाचे वाटप केले जात आहे. तसेच, भरलेले अर्ज जमा करण्यात येत आहेत. ते पडताळणी 29 जुलैपर्यंत केली जाणार आहे.

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार शहरातील तीनही विधानसभा मतदारसंघात मतदार यादी अद्ययावत करण्यासाठी सखोल पुनरीक्षणाचा कार्यक्रम (एसआयआर) मंगळवारपासून सुरू करण्यात आला आहे. बीएलओकडून मतदान केंद्रानुसार त्या त्या भागांतील घरोघरी जाऊन मतदारांना अर्जाचे वाटप करण्यात येत आहे.

तसेच, भरलेले अर्ज जमा केले जात आहेत. घरोघरी जाऊन अर्जाचे वाटप तसेच, अर्ज जमा करण्याची मुदत 29 जुलैपर्यंत आहे. मतदार यादी 5 ऑगस्टला तयार केली जाणार आहे. त्यावर 5 ऑगस्ट ते 4 सप्टेंबर या कालाधीत हरकती व सूचना स्वीकारण्यात येणार आहेत. त्यावर 5 ऑगस्ट ते 3 ऑक्टोबर या कालावधीत सुनावणी होणार आहे. अंतिम मतदार यादी 7 ऑक्टोबरला प्रसिद्ध केली जाणार आहे.

नागरिक अधिक माहितीसाठी मोबाईलमध्ये ईसीआयएनईटी हे ॲप डाउनलोड करून आपल्या बीएलओशी संपर्क करू शकतात. आपले नाव मतदार यादीत शोधण्यासाठी https://electoralsearch.eci.gov.in, https://voters.eci.gov.in या संकेतस्थळास भेट द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

नागरिकांनी आपल्या कुटुंबातील पात्र मतदारांची नोंदणी व माहिती अद्ययावत असल्याची खात्री करावी. आपल्या घरी येणाऱ्या बीएलओ कर्मचाऱ्यांना आवश्यक ती माहिती व कागदपत्रे देऊन सहकार्य करावे, असे आवाहन मतदार नोंदणी अधिकारी अर्चना यादव यांनी केले आहे.

## जमिनीच्या वादातून शिवसेना जिल्हाप्रमुखाचा गोळीबार; बावधन पोलिसांकडून दोघांना अटक

पिंपरी (दै. संध्या)

जमिनीच्या वादातून शिवसेनेचा (शिंदेसेना) जिल्हाप्रमुख बाळासाहेब चांदेरे याने पिस्तुलातून गोळीबार करून दहशत पसरवल्याचा प्रकार समोर आला आहे. बावधन पोलिस ठाण्याच्या हद्दीत सुस-नांदे रस्त्यावरील एका बांधकाम साईटवर गुरुवारी (दि. २ जुलै) मध्यरात्री एकच्या सुमारास ही घटना घडली. याप्रकरणी बावधन पोलिसांनी दोन संशयितांना अटक केली आहे.

शिंदेसेनेचा जिल्हाप्रमुख बाळासाहेब रामदास चांदेरे (वय ५४, रा. सुसगाव, ता. मुळशी) आणि संदेश सतीश माने (वय ३७, रा. कोंढवा, पुणे) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. नागेश मोहन राठोड (वय २१, रा. नऱ्हे, पुणे) यांनी याप्रकरणी गुरुवारी बावधन पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

> गुरुवारी मध्यरात्री गोळीबार झाल्याची माहिती मिळताच तातडीने कारवाई करून दोन संशयितांना अटक करण्यात आली आहे. प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.
> - अरविंद पवार, वरिष्ठ पोलिस निरीक्षक, बावधन

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी नागेश राठोड, राहुल सरकार आणि मेहबूब शेख हे रात्री सुसगाव येथील बांधकाम साइटवर गेले. काहीवेळाने बांधकाम साइटबाहेर एका कारमधून संशयित बाळासाहेब चांदेरे आला. चांदेरे आणि जागामालक लहूराज माळी यांच्यात जमिनीवरून वाद सुरू आहेत. या वादातून चांदेरे याने फिर्यादीसह त्यांच्या सहकार्यांना शिवीगाळ सुरू केली.

वादाचे रूपांतर हाणामारीत झाले. याच वेळी चांदेरे याने कमरेचे पिस्तूल बाहेर काढले. दरम्यान, आणखी एकजण दुचाकीवर तेथे आला आणि शिवीगाळ व दमदाटी करू लागला. चांदेरे याच्या हातातील पिस्तूल पाहताच नागेश राठोड, राहुल सरकार आणि मेहबूब शेख यांनी जीवाच्या भीतीने पळ काढला. काही अंतरावर गेल्यानंतर त्यांना एक गोळी झाडल्याचा आवाज ऐकू आला, असे फिर्यादीत नमूद आहे.

घटनेची माहिती मिळताच बावधन पोलिस घटनास्थळी दाखल झाले. संशयितांकडून एक पिस्तूल आणि चार जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली. याप्रकरणी मारहाण, धमकी, शस्त्र कायद्याचे उल्लंघन आणि महाराष्ट्र पोलिस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## पिंपरी-चिंचवडमध्ये पावसाचा कहर; रस्त्यांची दैनावस्था, भुयारी मार्गात पाणी साचले

पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड शहरात गेल्या दोन दिवसांपासून संततधार पाऊस पडत आहे. त्यामुळे शहरातील मुख्य तसेच, अंतर्गत रस्ते उखडून खड्डे पडले आहेत. तसेच, अनेक रस्ते व भुयारी मार्गात पाणी साचल्याने वाहनचालकांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागला. त्यामुळे महापालिका प्रशासन मान्सूनपूर्व तयारी करण्यात नापास झाल्याचे दिसत आहे.

संततधार पावसामुळे शहरातील बहुतांश भागांतील रस्ते उखडले आहेत. रस्त्यांवर मोठे मोठे खड्डे पडून पाणी साचून चिखल झाला आहे. तसेच, खडी रस्त्यावर पसरली आहे. तसेच, रस्त्यावर, भुयारी मार्ग व ग्रेडसेपरेटरमध्ये पाणी साचल्याने वाहनचालकांसह पादचाऱ्यांची गैरसोय झाली.

महामेट्रो व्यवस्थापन, पिंपरी-चिंचवड स्मार्ट सिटी कंपनी, पालिकेच्या पाणीपुरवठा विभाग, शहर दळणवळण विभाग व इतर विभागांकडून रस्ते खोदकाम केल्याने रस्त्याची दैनावस्था झाली आहे. पावसाळ्यापूर्वी रस्ते दुरुस्ती काम न केल्याने रस्त्यांवर खड्डे पडले आहेत.

पाणीपुरवठा व अर्बन स्ट्रीट डिजाईनचे कामे पावसाळा सुरू झाल्यानंतरी अपूर्ण असल्याने नागरिकांकडून संताप व्यक्त केला जात आहे. ड्रेनेजलाईन व स्टॉम वॉटरलाईन अद्याप स्वच्छ झाले नसल्याचे दिसून येत आहे. परिणामी, पावसाचे पाणी वाहून जात असल्याने ते रस्त्यावर साचून राहत आहे.



मावळ तालुक्यातील पवना धरण परिसर तसेच, पिंपरी-चिंचवड शहरात पावसाची संततधार सुरू आहे. त्यामुळे पवना धरणाच्या पाणीसाठ्यात वाढ होत आहे. धरणात शुक्रवार (दि. ३) सायंकाळी पाचपर्यंत केवळ १८. १४ टक्के इतका जलसाठा झाला आहे. दरम्यान, तीन ते चार दिवसांपासून शहरासह मावळ तालुका परिसरात पावसाची संततधार सुरू आहे. मात्र, पावसाचा जोर नसल्याने धरण क्षेत्रात पाणीसाठ्यामध्ये जलद वाढ होत नसल्याचे चित्र आहे.

गेल्या २४ तासांत धरण परिसरात ३९ मिलीमीटर पावसाची नोंद झाली आहे. एक जूनपासून आत्तापर्यंत एकूण २९३ मिलीमीटर पावसाची नोंद झाली आहे. पवना धरण परिसरात गुरुवार (दि. २) दुपारी चारपर्यंत १६.९६ टक्के पाणीसाठा होता. त्यात वाढ होऊन शुक्रवारी सायंकाळी पाचपर्यंत पाणीसाठा १८. १४ टक्क्यांवर पोहचला आहे.

गेल्या वर्षी याच दिवशी धरणात ६६.४९ टक्के इतका जलसाठा होता. त्यामुळे मावळ तालुक्यासह पिंपरी-चिंचवड शहरात दमदार पावसाची प्रतीक्षा शेतकऱ्यांसह शहरवासीयांकडून केली जात आहे.

# औषधनिर्माण शास्त्रातील शिक्षण अधिक गुणवत्तापूर्ण, उद्योगाभिमुख करण्याची गरज : डॉ. पटेल

पिंपरी (दै. संध्या)

औषध निर्माणशास्त्र ही अत्यंत महत्त्वाची शाखा असून, या क्षेत्रात करिअरची मोठी संधी आहे. त्यामुळे हे शिक्षण अधिक गुणवत्तापूर्ण, विद्यार्थीकेंद्रित, उद्योगाभिमुख आणि समाजोपयोगी करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे, असे प्रतिपादन भारतीय औषधनिर्माणशास्त्र परिषद नवी दिल्लीचे अध्यक्ष डॉ. मोंटूकुमार पटेल यांनी केले.

इंद्रायणी विद्या मंदिर संस्था, तळेगाव दाभाडे येथे फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया सोबत महाराष्ट्रातील फार्मसी महाविद्यालयांचे व्यवस्थापन व प्राचार्यांची बैठक संपन्न झाली. यावेळी भारतीय औषधनिर्माणशास्त्र परिषद नवी दिल्लीचे उपाध्यक्ष जशुभाई चौधरी, सदस्य जगन्नाथ शिंदे, सुशीलकुमार बन्सल, डॉ. संजय तोष्णीवाल, विजय पाटील, इंद्रायणी विद्या मंदिर संस्थेचे अध्यक्ष रामदास काकडे, कार्यवाह चंद्रकांत शेटे, उपाध्यक्ष शैलेश शहा, उपाध्यक्ष संजय साने, खजिनदार निरूपा कानेटकर, यशोदा टेक्निकल कॅम्पस साताराचे अध्यक्ष डॉ. दशरथ सगरे, उपाध्यक्ष डॉ. अजिंक्य सगरे, कॅम्पस डायरेक्टर डॉ. नरेंद्र नार्वे, फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय आरोटे, इंद्रायणी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संभाजी मलघे, व्यवस्थापन अभ्यासक्रमाच्या प्रभारी संचालक व विभागप्रमुख प्रा. विद्या भेगडे, प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे, महाराष्ट्रातील विविध औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयांचे सहाशेहून अधिक प्राचार्य, संस्थाचालक व प्रतिनिधी उपस्थित होते.

इंद्रायणी विद्या मंदिर संस्थेचे अध्यक्ष रामदास काकडे म्हणाले, की देशातील फार्मसी शिक्षणाच्या सर्वांगीण विकासासाठी स्वतंत्र फार्मसी विद्यापीठाची निर्मिती होणे ही काळाची गरज आहे. संशोधन, नवोपक्रम, गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि उद्योगाभिमुख अभ्यासक्रम यांच्या माध्यमातून जागतिक दर्जाचे फार्मसी शिक्षण विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यासाठी अशा विद्यापीठांची स्थापना आवश्यक आहे. औषधनिर्मिती क्षेत्रात भारताने ॲक्टिव्ह फार्मास्युटिकल इन्ग्रेडिएंट्स (API) उत्पादनात पूर्ण स्वावलंबन प्राप्त करणे अत्यंत गरजेचे आहे. आयातीवरील अवलंबित्व कमी करून स्वदेशी उत्पादनाला चालना दिल्यास भारत औषधनिर्मिती क्षेत्रात अधिक सक्षम व आत्मनिर्भर बनेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

बैठकीदरम्यान फार्मसी कौन्सिल ऑफ इंडियाचे अध्यक्ष डॉ. मोंटूकुमार पटेल आणि उपाध्यक्ष जस्सूभाई चौधरी यांनी महाराष्ट्रातील फार्मसी शिक्षण आणि फार्मसी व्यवसायाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी आवश्यक विविध विषयांवर सखोल चर्चा केली. महाराष्ट्र शासनासमोर फार्मसी शिक्षण व व्यवसायाशी संबंधित विविध प्रश्न प्रभावीपणे मांडण्यासाठी सर्व संस्थांनी एकत्रित प्रयत्न करण्याचे आवाहन त्यांनी केले. महाराष्ट्रात स्वतंत्र फार्मसी विद्यापीठ अथवा परीक्षा प्राधिकरणाची स्थापना करून फार्मसी अभ्यासक्रमांना संलग्नता देण्याबाबत सकारात्मक विचार मांडण्यात आला. फार्मसी कौन्सिल ऑफ इंडियाच्या विविध धोरणे, नियम, मानके आणि निर्देशांची काटेकोर अंमलबजावणी करणे, तसेच गुणवत्तापूर्ण फार्मसी शिक्षणासाठी आवश्यक उपाययोजनांवर मार्गदर्शन करण्यात आले. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP 2020) अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ पासून लागू होणाऱ्या बी. फार्म. अभ्यासक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्यभर कार्यशाळांचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली.




पहिल्या सत्रात झालेल्या चर्चेत फार्मसी शिक्षणाच्या गुणवत्ता, मान्यता प्रक्रिया आणि रोजगाराभिमुख विषयांवर चर्चा झाली. दुसऱ्या सत्रात औषध निर्माण शास्त्रातील डिप्लोमा अभ्यासक्रमातील एक वर्षाच्या इंटर्नशिपची प्रभावी अंमलबजावणी, उद्योगांकडून इंटर्नशिपदरम्यान विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य, समुपदेशन केंद्र सुरू करण्याची गरज, साथीच्या रोगांच्या काळात फार्मासिस्टची महत्त्वपूर्ण भूमिका यावर विशेष भर देण्याविषयी चर्चा करण्यात आली. औषध निर्माण शास्त्रातील पदवी अभ्यासक्रमातील सुधारणा, राष्ट्रीय मूल्यांकन आणि मान्यता परिषद व स्वायत्त दर्जाचे महत्त्व, स्वायत्त संस्थांना तीन वर्षांच्या मान्यतेबाबतचे धोरण, औषध निर्माण शास्त्रातील डिप्लोमा आणि पदवी प्रवेश पात्रतेतील फरक आणि संस्थात्मक स्वायत्ततेसंदर्भात चर्चा झाली.

उपस्थितांनी परिषदेत मांडलेल्या सूचना, शिफारसी आणि प्रलंबित विषयांवर पुढील आठवड्यात संबंधित पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत अंतिम निर्णय घेण्याचे आश्वासन डॉ. मोंटूकुमार पटेल यांनी दिले. औषधनिर्माण शास्त्रातील अडचणी व समस्या यावर चर्चा करून अधिकाधिक विद्यार्थीभिमुख शिक्षण देणे काळाची गरज आहे, असा सूर चर्चासत्रात उमटला. डॉ.गजानन एकबोटे यांनी व्यवस्थापन प्रतिनिधींच्या वतीने मनोगत व्यक्त केले. दरम्यान, ऐतिहासिक 'अजान वृक्षा'च्या पाच रोपांपैकी एका रोपाचे मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला.

संस्थेच्या खजिनदार निरुपा कानिटकर यांनी आभार मानून, फार्मसी शिक्षणाच्या गुणवत्तावृद्धीसाठी आणि व्यवसायाच्या प्रगतीसाठी झालेली ही बैठक निश्चितच दिशादर्शक ठरेल, असा विश्वास व्यक्त केला.

प्रास्ताविक फार्मसी कौन्सिल ऑफ इंडियाचे सदस्य विजय पाटील यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. प्रियंका रोकडे व डॉ. योगेश झांबरे यांनी केले. प्राचार्यांच्या दुसऱ्या सत्राचे आभार फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय आरोटे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी यशोदा टेक्निकल कॅम्पसचे रजिस्ट्रार गणेश सुरवसे, गोरख काकडे, इंद्रायणी विद्या मंदिर संस्थेचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### वाघोलीत भटक्या कुत्र्यांचा 6 वर्षीय चिमुकल्यावर हल्ला

वाघोली (दैनिक संध्या) : वाघोलीतील भैरवनाथ मंदिर परिसरात शुक्रवारी (ता. ३) सकाळी घडलेल्या धक्कादायक घटनेत घराबाहेर खेळत असलेल्या सहा वर्षीय चिमुकल्यावर पाच ते सहा भटक्या कुत्र्यांनी हल्ला केला. या हल्ल्यात मुलाच्या गळ्यावर गंभीर जखमा झाल्या असून, कुत्र्याच्या आणि मुलाच्या झटापटीत मुलगा पडून डोक्यालाही मार लागला आहे. जखमी मुलावर सध्या ससून रुग्णालयात उपचार सुरू आहेत. नैतिक शिवनाथ तुपे (वय ६ ) असे जखमी मुलाचे नाव आहे. सकाळी सुमारे सातच्या सुमारास नैतिक हा भावडी रस्त्यावरील भैरवनाथ मंदिराजवळील घरासमोर खेळत होता. खेळता-खेळता तो रस्त्याच्या पलीकडे गेला असता, तेथे दबा धरून बसलेल्या पाच ते सहा भटक्या कुत्र्यांनी अचानक त्याच्यावर हल्ला चढविला. कुत्र्यांनी त्याच्या गळ्यावर चावा घेतल्याने तो त्यामध्ये गंभीर जखमी झाला. हल्ल्यादरम्यान तो खाली पडल्याने त्याच्या डोक्यालाही जबर दुखापत झाली. ही घटना पाहून रस्त्याने जाणाऱ्या नागरिकांनी तातडीने धाव घेत कुत्र्यांच्या तावडीतून नैतिकची सुटका केली. घटनेची माहिती मिळताच आई-वडील आणि आजी-आजोबांनी त्याला तातडीने ससून रुग्णालयात दाखल केले आहे. घटनेनंतर परिसरातील नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली असून, भटक्या कुत्र्यांचा तातडीने बंदोबस्त करण्याची मागणी होत आहे. वाघोली परिसरात भटक्या कुत्र्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

### सातारा जिल्हा महानुभाव परिषद अध्यक्षपदी मुकुंदराज बाबाजी बिडकर नियुक्ती

कोरेगामुळ (दैनिक संध्या) : अखिल भारतीय महानुभाव परिषद अंतर्गत सातारा जिल्हा महानुभाव परिषदेच्या अध्यक्षपदी उपाध्य कुलभूषण आचार्यप्रवर महंत मुकुंदराज बाबाजी बिडकर महानुभाव फलटण यांची



नियुक्ती करण्यात आली. यानिमित्ताने समस्त निंबाळकर परिवार तर्फे हणमंतराव निंबाळकर, मनिष निंबाळकर, राजेंद्र निंबाळकर, दिपक निंबाळकर, उदय निंबाळकर, कैलास निंबाळकर, सचिन निंबाळकर, हर्षल निंबाळकर, सुरेंद्र निंबाळकर यांच्या हस्ते स्वागत करण्यात आले. महानुभाव पंथाच्या विचारांचा प्रसार व्हावा, धर्माच्या समाजहिताचा विकास आणि संघटन व्हावे, परिषद बळकटीकरण हा आमचा संकल्प. महानुभाव पंथाचे तत्वज्ञान, संस्कार व परंपरा यांचा प्रचार व प्रसार करणे परिषदेच्या माध्यमातून. सातारा जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते व सदस्य यांच्यात समन्वय राखून परिषद संघटन बळकट करणे. धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे नियोजन करुन यामध्ये मार्गदर्शन करणे. हे परिषदेच्या माध्यमातून तसेच अखिल भारतीय महानुभाव परिषदेचे अध्यक्ष तथा महानुभाव आश्रम राजापेठ संचालक - विकासपुरुष, महानुभाव भुषण, श्रद्धेय कविश्वर कुळाचार्य प.पु.प.म.श्रीकारंजेकर बाबा महानुभाव यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही सर्व जण काम करणार असल्याचे मतं सातारा जिल्हा महानुभाव परिषद अध्यक्ष मुकुंदराजबाबाजी बिडकर यांनी सांगितले.



### जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना रेनकोट व शालेय साहित्याचे वाटप

राजगुरुनगर (दैनिक संध्या) : वाफगाव येथील जिल्हा परिषद शाळा व अंगणवाडीच्या विद्यार्थ्यांना रेनकोट, शालेय साहित्य व वह्या वाटप करण्यात आले. उद्योजक व सामाजिक कार्यकर्ते शैलेश मांदळे व सारिकाताई मांदळे यांच्या माध्यमातून या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शालेय विद्यार्थी, शिक्षक, पालक व ग्रामस्थ उपस्थित होते. ग्रामीण भागातील विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये व येथील विद्यार्थ्यांना भौतिक सुविधा मिळाव्यात या उद्देशाने वाफगाव येथील मराठी शाळा व अंगणवाडीच्या विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व वह्या वाटप हा उपक्रम राबविला. सध्या पावसाळा असल्याने विद्यार्थ्यांचे पावसामुळे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून सर्व विद्यार्थ्यांना रेनकोटचे वाटप करण्यात आले असल्याचे सारिकाताई मांदळे यांनी सांगितले. हा स्तुत्य उपक्रम राबविण्यात आल्याने विद्यार्थ्यांच्या मध्ये आनंदाचे वातावरण होते. गावातील ग्रामस्थांचे जिल्हा परिषद शाळेकडे नेहमीच लक्ष आहे. त्यामुळे शाळेला मोठ्या प्रमाणात भौतिक सुविधा उपलब्ध झाल्या आहेत व विद्यार्थ्यांना याचा फायदा झाला असल्याचे शिक्षकांनी यावेळी सांगितले. याप्रसंगी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गणेश कराळे, गणेश सुर्वे, शैलेश मांदळे, माजी उपसरपंच नंदकुमार सुर्वे, ग्रामपंचायत सदस्य अमोल कराळे, मुरलीधर दौंडकर, रज्जाकभाई इनामदार, शरद थिटे, अमर बोऱ्हाडे, राजेंद्र कराळे, दिलीप कंगणे, सचिन मोरवे, सागर खोले व ग्रामस्थ उपस्थित होते.

### आळेफाटा येथे जनावरांची बेकायदेशीर वाहतूक करणाऱ्या दोघांना अटक

नारायणगाव (दैनिक संध्या) : प्राण्यांची अमानुषपणे आणि विनापरवाना वाहतूक करणाऱ्या एका वाहनावर आळेफाटा पोलिसांनी धडक कारवाई केली आहे. या कारवाईत पोलिसांनी कत्तलीच्या उद्देशाने नेली जाणारी चार जर्सी जनावरे सुरक्षितपणे ताब्यात घेतली असून, दोन संशयितांना अटक केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, जुन्नर तालुक्यातील गुंजाळवाडी परिसरातून एका पिकअप वाहनातून जनावरांची संशयास्पद वाहतूक होत असल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांनी तात्काळ परिसरात सापळा रचला. तपासणी दरम्यान पोलिसांनी संशयास्पद पिकअप वाहन क्र. एम.एच. १६, ए.ई. ७१०७ थांबवून त्याची तपासणी केली. यावेळी वाहनात तीन गायी आणि एक कालवड अत्यंत दाटीवाटीने, चारा व पाण्याविना क्रूरपणे बांधलेल्या अवस्थेत आढळून आल्या.

# आषाढी वारीच्या तोंडावर इंद्रायणी फेसाळली

## लाखो वारकऱ्यांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर, प्रशासनाच्या निष्क्रियतेवर संताप

**आळंदी (दै. संध्या)**

आषाढी वारी अवघ्या पाच-सहा दिवसांवर येऊन ठेपली असताना लाखो वारकऱ्यांचे श्रद्धास्थान असलेली पवित्र इंद्रायणीनदी पुन्हा एकदा प्रदूषणाच्या विळख्यात सापडली आहे. औद्योगिक वसाहतींमधून प्रक्रिया न केलेले रसायनयुक्त पाणी आणि मैलामिश्रित सांडपाणी थेट नदीपात्रात सोडले जात असल्याने नदीच्या पाण्यावर पांढऱ्याशुभ्र रासायनिक फेसाची चादर पसरली आहे. वारीपूर्वी नदी प्रदूषणाचा प्रश्न गंभीर बनल्याने वारकरी, स्थानिक नागरिक आणि पर्यावरणप्रेमींमध्ये तीव्र चिंता व्यक्त होत असून प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.




गेल्या दोन दिवसांपासून आळंदीतील जुन्या बंधाऱ्याखालील इंद्रायणी नदीपात्रात रासायनिक फेसाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. संपूर्ण नदीवर जणू बर्फाची पांढरी चादर पसरल्याचा भास निर्माण करणारे हे दृश्य प्रत्यक्षात नदीच्या प्रदूषणाचे आणि पर्यावरणीय ऱ्हासाचे भयावह चित्र असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. या प्रदूषणाचा सर्वाधिक फटका जलचर सृष्टीला बसत असून नदीतील मासे आणि इतर जीवांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. याशिवाय आषाढी वारीसाठी देशभरातून येणारे लाखो वारकरी इंद्रायणीत पवित्र स्नान करतात आणि हेच पाणी तीर्थ म्हणून प्राशन करतात. मात्र, दूषित पाण्यामुळे त्वचारोग, पोटाचे विकार आणि इतर संसर्गजन्य आजारांचा धोका वाढल्याची भीती व्यक्त केली जात आहे. स्थानिक नागरिकांनाही या प्रदूषणाचा मोठा फटका बसत आहे. नदीकाठच्या विहिरी आणि बोअरवेलचे पाणी दूषित होत असल्याने पिण्याच्या पाण्याबाबतही चिंता वाढली आहे. तसेच नदीतील पाणी शेतपंपाद्वारे शेतीसाठी वापरले जात असल्याने रसायनयुक्त पाण्याचा परिणाम पिकांवर होत असून, अशा पिकांमुळे माणसे आणि जनावरे यांच्या आरोग्यावरही विपरीत परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### प्रशासनाच्या भूमिकेवर संताप

आषाढी वारीसारखा राज्याचा सर्वांत मोठा धार्मिक सोहळा काही दिवसांवर आला असताना इंद्रायणी नदी स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी प्रशासनाने पार पाडणे अपेक्षित होते. मात्र, प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि स्थानिक प्रशासनाकडून प्रभावी उपाययोजना होत नसल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे. वारीपूर्वी नदीतील प्रदूषण रोखून कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी जोरदार मागणी वारकरी, ग्रामस्थ आणि पर्यावरणप्रेमींनी केली आहे.

## दौंडमधील रोटी घाट संत तुकाराम महाराज पालखीसाठी सज्ज; फुलांनी सजलेला घाट आकर्षण ठरतोय

**खोर (दै. संध्या)**



जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच्या पालखी सोहळ्याच्या स्वागतासाठी दौंड तालुक्यातील रोटी घाट सज्ज झाला असून, संपूर्ण घाट परिसर रंगीबेरंगी फुलांच्या आकर्षक सजावटीने खुलून दिसत आहे. पालखीमार्गावरील स्वच्छता, सुशोभीकरण आणि स्वागताची जय्यत तयारी पूर्ण झाल्याने तुकोबांच्या आगमनाची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.

संत तुकाराम महाराजांचा पालखी सोहळा १२ जुलै रोजी दौंड तालुक्यात दाखल होणार आहे. १३ जुलै रोजी वरवंड येथे मुक्काम झाल्यानंतर पालखी पाटसमार्गे रोटी घाटातून गवळ्याची उंडवडीकडे प्रस्थान करणार आहे. या दिवशी सुमारे ३९ किलोमीटरचा टप्पा पार करून पालखी गवळ्याची उंडवडी येथे मुक्कामी पोहोचणार असल्याने रोटी घाटाला यंदा विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

यंदा पावसाचे प्रमाण कमी असले तरी रोटी घाटाच्या मध्यभागी लावण्यात आलेल्या रंगीबेरंगी फुलांमुळे संपूर्ण मार्ग आकर्षक बनला आहे. घाटातून प्रवास करणाऱ्या वारकरी, भाविक आणि वाहनचालकांना हा निसर्गरम्य देखावा विशेष आनंद देत आहे.

पालखी मार्गावर स्वागत कमानी, दिशादर्शक फलक, स्वच्छता मोहीम, वाहतूक नियोजन, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था तसेच आरोग्य व आपत्कालीन सेवांची तयारी प्रशासनाकडून करण्यात आली आहे. स्थानिक ग्रामस्थ, सामाजिक संस्था आणि स्वयंसेवकही वारकऱ्यांच्या सेवेसाठी उत्साहाने पुढे सरसावले आहेत.

रोटी घाट हा केवळ वाहतुकीचा मार्ग नसून, वारकरी परंपरेतील श्रद्धा, भक्ती आणि संस्कृतीचा साक्षीदार आहे. दरवर्षी लाखो वारकरी "ज्ञानोबा-तुकोबा"चा जयघोष करत या घाटातून मार्गक्रमण करतात. यंदा रंगीबेरंगी फुलांनी सजलेल्या रोटी घाटामुळे पालखी सोहळ्याचे स्वागत अधिक दिमाखदार आणि अविस्मरणीय ठरणार आहे. रोटी घाट सज्ज झाला असून, आता प्रतीक्षा आहे ती तुकोबांच्या आगमनाची, असे पाटस येथील सामाजिक कार्यकर्ते तानाजी केकाण यांनी सांगितले.

## यवत हादरले! पिस्तुलाचा धाक दाखवून 23 वर्षीय तरुणीचे अपहरण

**यवत (दै. संध्या)**

दौंड तालुक्यातील बोरीभडक येथे एका 23 वर्षीय तरुणीचे पिस्तुलाचा धाक दाखवून घरातून जबरदस्तीने अपहरण करण्यात आल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या प्रकरणी यवत पोलीस ठाण्यात तीन जणांविरुद्ध गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

यवत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही घटना 2 जुलै 2026 रोजी सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास बोरीभडक येथील फिर्यादी विद्याधर नारायण पवार (वय 60) यांच्या राहत्या घरी घडली. आरोपी कमरुद्दीन मुकीम शेख (रा. सय्यद नगर, हडपसर, पुणे) हा त्याच्या दोन अनोळखी साथीदारांसह फिर्यादीच्या घरी आला. त्यानंतर फिर्यादीची मुलगी अक्षदा पवार (वय 23) हिला तिच्या इच्छेविरुद्ध जबरदस्तीने ओढत घराबाहेर आणून चारचाकी वाहनात बसवून पळवून नेल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे.

यावेळी फिर्यादी व त्यांच्या कुटुंबीयांनी आरोपींना अडविण्याचा प्रयत्न केला असता आरोपींनी पिस्तुलाचा धाक दाखवत गोळ्या घालून ठार मारण्याची धमकी दिली. तसेच फिर्यादीच्या वडिलांना ढकलून मारहाण केली, तर पत्नीला लाथ मारून शिवीगाळ केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. याच गोंधळाचा फायदा घेत आरोपींनी घरातील रु. 5 लाख 1 हजार 500 रोख रक्कम आणि सुमारे 7 तोळे वजनाचे सोन्याचे गंठण असा एकूण लाखो रुपयांचा ऐवज चोरून नेल्याचाही आरोप करण्यात आला आहे.

## विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी अतिरिक्त एसटी बसची मागणी

**नारायणगाव (दै. संध्या)**

जुन्नर तालुक्यातील ओतूर ते कोपरे मार्गावर एसटी बसच्या कमतरतेमुळे विद्यार्थ्यांचे प्रचंड हाल होत असून, या मार्गावर अतिरिक्त बस सुरू करण्याची मागणी तेथील पालकांनी व ग्रामस्थांनी केली आहे. याबाबत नारायणगाव आगार प्रमुखांना पत्र देण्यात आले आहे. ओतूर ते कोपरे या दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यासाठी एसटी बस हा एकमेव पर्याय आहे. मात्र, बस वेळेवर येत नसल्याने विद्यार्थ्यांना मनस्ताप सहन करावा लागत आहे.या मार्गावर शाळा सुटण्याच्या वेळेत फक्त एकच बस उपलब्ध असल्यामुळे विद्यार्थ्यांची प्रचंड गर्दी होते.

अनेकदा प्रवाशांना आणि विद्यार्थ्यांना जागा मिळत नाही. बस चुकल्यास किंवा जागा न मिळाल्यास विद्यार्थ्यांना घराकडे परत जावे लागते. यामुळे त्यांच्या शैक्षणिक सत्रांचे मोठे नुकसान होत आहे. मांदारणे येथील पालकांनी गुरुवारी ओतूर बस स्थानक नियंत्रण वाहतूक अधिकारी एस. बी. मिलके यांची भेट घेऊन विद्यार्थ्यांच्या समस्या सांगितल्या. यावेळी नारायणगाव आगार प्रमुखांच्या नावे एक मागणीचे निवेदन सादर करण्यात आले.

यावेळी नारायणगावचे माजी उपसरपंच योगेश पाटे ,रोहोकडीचे सरपंच सचिन घोलप, पालक अभिमन्यू महाकाळ, अस्मिता महाकाळ, सरपंच सविता ठोसर, ग्रामपंचायत सदस्य शारदा भोर, राजाराम महाकाळ, विष्णू भोर, बाबाजी भोर, ललिता महाकाळ, सुरेश ठोसर आदी उपस्थित होते.

## हवेली तालुक्यात बनावट शासकीय आदेशांचा मोठा घोटाळा

**लोणी काळभोर (दै. संध्या)**

### महसूल विभागात खळबळ

हवेली तालुक्यातील केसनंद येथील बनावट शासकीय आदेश प्रकरणाची चौकशी सुरू असतानाच पूर्व हवेलीतील वाडेबोल्हाई येथेही एका जमिनीच्या प्रकरणात बनावट आदेश वापरल्याचे प्रकरण उघडकीस आल्याने महसूल विभागात मोठी खळबळ उडाली आहे.

भूमी अभिलेख हवेली कार्यालयाच्या नावाने बनावट आकारफोड, बनावट मोजणीची 'क' प्रत, तसेच लोणी काळभोर अप्पर तहसील कार्यालयाच्या नावाने बनावट आदेश, बनावट स्वाक्षऱ्या आणि बनावट शिक्के तयार करून तलाठी कार्यालयात अभिलेखात नोंद घेण्यासाठी सादर करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणात एका फेरफाराला मंजुरी मिळाली, तर दुसरा फेरफार रद्द करण्यात आल्याची माहिती समोर येत असून, शासनाची फसवणूक करण्याचा गंभीर प्रयत्न झाल्याचे स्पष्ट होत आहे.

महसूल विभागाकडून या दोन्ही प्रकरणांची सखोल चौकशी सुरू असून, या घोटाळ्याची व्याप्ती आणखी वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. दरम्यान, केसनंद बनावट आदेशप्रकरणी वाघोली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर त्यामध्ये राजकीय हस्तक्षेपाच्या आरोपांच्या पार्श्वभूमीवर हा तपास पोलिस आयुक्तालयाकडे वर्ग करण्यात आला आहे. निष्पक्ष चौकशीत पूर्व हवेलीतील बनावट आदेशांचे मोठे रॅकेट उघड होण्याची शक्यता व्यक्त होत असून, अशा आदेशांच्या आधारे झालेल्या प्लॉटिंगमुळे हजारो ग्राहकांची फसवणूक झाल्याचेही समोर येऊ शकते. वाडेबोल्हाई येथील गट क्रमांक ९०३ आणि ७३० मधील सातबाराधारकांनी भूमी अभिलेख हवेली कार्यालयाच्या नावाने तयार करण्यात आलेले बनावट फाळणीबारा, आकारफोड व कजाप आदेश नोंदविण्यासाठी सादर केले होते. त्यानुसार फेरफार क्रमांक ९०९५ द्वारे गट क्रमांक ९०३चे पोटहिस्से तयार करण्यात आले आणि वाघोली मंडळ अधिकाऱ्यांनी तो फेरफार मंजूरही केला. तसेच गट क्रमांक ७३० मध्ये फेरफार क्रमांक ९१६९ नुसार पोटहिस्से तयार करण्यात आले. मात्र, केसनंद प्रकरण उघडकीस आल्यानंतर संशय निर्माण झाल्याने हा फेरफार रद्द करण्यात आला. प्रकरण गंभीर असल्याचे लक्षात येताच संबंधित तलाठ्यांनी घाईघाईने अप्पर तहसील कार्यालयाकडे अहवाल सादर केला आणि कागदपत्रांची पडताळणी करण्यासाठी भूमी अभिलेख विभागाकडे प्रस्ताव पाठविला. पडताळणीनंतर संबंधित आदेश भूमी अभिलेख कार्यालयाने कधीच जारी केले नसल्याचे स्पष्ट झाल्याने बनावट कागदपत्रांचा वापर झाल्याचे सिद्ध झाले आहे. आता महसूल विभाग या संपूर्ण प्रकरणात कोणती कारवाई करतो, बनावट आदेशांचे जाळे किती मोठे आहे आणि त्यामागील सूत्रधारांपर्यंत तपास पोहोचतो का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. तसेच, या प्रकरणात दोषींना राजकीय संरक्षण न देता कठोर कारवाई करून फसवणूक झालेल्या शेतकरी व नागरिकांना न्याय मिळावा, अशी मागणी जोर धरत आहे.

## "वारकऱ्यांची सेवा हीच माऊलीची सेवा; प्रत्येक वारकरी भाविकाला उत्तम सुविधा देण्यासाठी आम्ही कटिबद्ध" – नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे

**आळंदी (दै. संध्या)**

"आषाढी वारी हा केवळ धार्मिक सोहळा नसून महाराष्ट्राच्या संस्कृतीचा, श्रद्धेचा आणि सामाजिक ऐक्याचा महोत्सव आहे. लाखो वारकरी माऊलीच्या दर्शनासाठी आळंदीत येतात. त्यांच्या सेवेत कोणतीही कमतरता राहू नये, हीच आमची प्राथमिकता आहे. वारकऱ्यांना स्वच्छ, सुरक्षित आणि सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आळंदी नगरपरिषद पूर्ण क्षमतेने काम करत असून प्रत्येक भाविकाला उत्तम सुविधा देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत," असे प्रतिपादन नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे यांनी केले.

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज पालखी प्रस्थान सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर आळंदी शहरात सुरू असलेल्या विविध विकास व सुविधा कामांची नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे यांनी प्रत्यक्ष पाहणी करून आढावा घेतला. यावेळी मुख्याधिकारी माधव खांडेकर, उपनगराध्यक्ष सुजाता तापकीर, विरोधीपक्षनेते आदित्य घुंडरे, यात्रा समितीच्या सभापती पूजा संजय घुंडरे, गटनेते सचिन गिलबिले, नगरसेवक-नगरसेविका तसेच नगरपरिषदेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

पाहणीदरम्यान नगराध्यक्ष कुऱ्हाडे यांनी देहूफाटा स्थानक, इंद्रायणी घाट, दर्शनबारी परिसर, प्रदक्षिणा मार्ग, मंदिर परिसर तसेच पालखी मार्गावरील विविध ठिकाणी सुरू असलेल्या स्वच्छता, रस्ते दुरुस्ती, प्रकाशयोजना, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, सार्वजनिक स्वच्छतागृहे आणि इतर मूलभूत सुविधांच्या कामांचा आढावा



घेतला. संबंधित विभागांना कामे वेळेत आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

यावेळी नगराध्यक्ष कुऱ्हाडे म्हणाले, "आळंदी ही संत ज्ञानेश्वर माऊलींची पावन भूमी असून राज्यभरातून आणि देशाच्या विविध भागांतून लाखो वारकरी येथे दाखल होतात. त्यामुळे त्यांच्या सुरक्षिततेसह स्वच्छता, आरोग्य, वाहतूक, निवास आणि इतर सर्व सुविधांबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नाही. सर्व विभागांमध्ये प्रभावी समन्वय साधून नियोजन करण्यात आले असून प्रत्येक यंत्रणा सज्ज आहे."

मुख्याधिकारी माधव खांडेकर यांनी सांगितले की, पालखी सोहळ्याच्या काळात नगरपरिषदेचे सर्व अधिकारी व कर्मचारी पूर्णवेळ कार्यरत राहणार आहेत. नागरिकांच्या सहकार्याने पालखी सोहळा सुरळीत आणि निर्विघ्न पार पाडण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

भाविकांची कोणतीही गैरसोय होणार नाही, यासाठी प्रत्येक सुविधेवर सातत्याने लक्ष ठेवले जात आहे. आषाढी पालखी प्रस्थान सोहळ्याच्या स्वागतासाठी आळंदी नगरी सज्ज झाली असून, वारकऱ्यांच्या सेवेसाठी नगरपरिषदेची यंत्रणा युद्धपातळीवर कार्यरत असल्याचे चित्र सध्या शहरात पाहायला मिळत आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे

### आता महाराष्ट्र शासनाचे थेट अपडेट्स मिळणार

मुंबई (दैनिक संध्या) : समाजमाध्यमांच्या विविध प्लॅटफॉर्म्सद्वारे नागरिकांपर्यंत अचूक, अधिकृत आणि वस्तुनिष्ठ माहिती पोहोचविणाऱ्या महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने आता 'व्हॉट्सअॅप' चॅनल आणि'पब्लिक'अॅप वर अधिकृत, प्रमाणित खाती सुरू केली आहेत. आता नागरिक 'व्हॉट्सअॅप' चॅनलवर DGIPR, Govt of Maharashtra या नावाने, तर पब्लिक अॅपवर महाराष्ट्र शासन (@ mahadgipr) या नावाने शासकीय घडामोडींचे थेट अपडेट्स मिळवू शकतील. या दोन्ही प्लॅटफॉर्म्समुळे जनतेपर्यंत अधिक गतीने, अचूक, अधिकृत आणि वस्तुनिष्ठ माहिती थेट आणि व्यापक स्वरूपात पोहोचण्यास मोठी मदत होणार आहे. शासन आणि जनतेला जोडणारा महत्त्वाचा दुवा आणि महाराष्ट्र शासनाच्या प्रसिद्धीच्या कामाचे संपूर्ण समन्वयन करणारी यंत्रणा म्हणून माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाची ओळख आहे.

### राज ठाकरे यांचे मुख्यमंत्री फडणवीसांना खुले पत्र

मुंबई (दैनिक संध्या) : महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना उद्देशून एक सडेतोड खुले पत्र लिहित राज्यातील सत्ताधारी नेतृत्वाच्या कार्यपद्धतीवर आणि वाढत्या असंवेदनशीलतेवर तीव्र शब्दांत टीका केली आहे. सत्तेच्या अहंकारामुळे महाराष्ट्राच्या राजकीय संस्कृतीला धक्का बसत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. राज ठाकरे यांनी पत्रात म्हटले आहे की, केंद्रातील सत्ताधाऱ्यांना सत्तेचा माज आला असल्याची भावना देशभरातील जनतेमध्ये निर्माण झाली असून, त्याचा परिणाम आता महाराष्ट्राच्या राजकारणावरही दिसून येत आहे. महाराष्ट्राच्या राजकीय परंपरेचा आणि येथील नेत्यांच्या सुसंस्कृत व संवेदनशील प्रतिमेचा देशभर गौरव केला जात होता. मात्र, गेल्या काही वर्षांत महाराष्ट्राचे राजकारणही काही मागास विचारांच्या राज्यांच्या पातळीवर जात असल्याचे दिसत असल्याची टीका त्यांनी केली. राज ठाकरे यांनी सत्ताधारी पक्षाच्या एका आमदाराने आणि पदाधिकाऱ्याने लोकांच्या मृत्यूवर हसल्याचा उल्लेख करत, अशा प्रकारांवर कोणतीही कठोर कारवाई होत नसल्याबद्दल नाराजी व्यक्त केली. "Power tends to corrupt, and absolute power corrupts absolutely" या प्रसिद्ध उक्तीचा संदर्भ देत त्यांनी सत्तेच्या गैरवापराबाबत इशारा दिला.



### दिव्यांग विवाह प्रोत्साहन योजनेच्या माहितीसाठी संपर्क करावा – मंत्री सावे

मुंबई (दैनिक संध्या) : दिव्यांग व्यक्तींना समाजाच्या मुख्य प्रवाहात सन्मानाने सहभागी करून घेण्यासाठी आणि त्यांच्या सामाजिक सुरक्षेला बळकटी देण्यासाठी दिव्यांग सक्षमीकरण विभागामार्फत विवाह प्रोत्साहन योजना राबविण्यात येत आहे. दिव्यांग-अव्यंग तसेच दिव्यांग-दिव्यांग विवाह प्रोत्साहन योजनेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या पात्र लाभार्थ्यांनी अधिक माहितीसाठी संबंधित जिल्हा परिषदेमधील सहाय्यक आयुक्त, दिव्यांग सक्षमीकरण विभाग तसेच मुंबई शहर व मुंबई उपनगर येथील सहाय्यक आयुक्त, दिव्यांग सक्षमीकरण विभागाच्या कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन दिव्यांग सक्षमीकरण विभागाचे मंत्री अतुल सावे यांनी केले आहे. १८ डिसेंबर २०२५ रोजी किंवा त्यानंतर विवाह केलेल्या दिव्यांग-अव्यंग तसेच दिव्यांग-दिव्यांग दाम्पत्यांनी 'दिव्यांग सहाय्यक पोर्टल'वर ऑनलाइन अर्ज करून या योजनेचा लाभ घ्यावा. या योजनेअंतर्गत दिव्यांग-अव्यंग विवाहासाठी १ लाख ५० हजार रुपये, तर दिव्यांग-दिव्यांग विवाहासाठी २ लाख ५० हजार रुपये अर्थसहाय्य देण्यात येते. योजनेअंतर्गत मंजूर होणारी संपूर्ण अनुदानाची रक्कम पती-पत्नीच्या संयुक्त बँक खात्यात थेट लाभ हस्तांतरण प्रणालीद्वारे जमा केली जाईल.

# सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजना लागू; ३१ जुलैपूर्वी शेतकऱ्यांनी नोंदणी करावी : कृषी मंत्री दत्तात्रय भरणे

## नैसर्गिक आपत्तींमुळे होणाऱ्या पीक नुकसानीस आर्थिक संरक्षण; खरीपातील १४ पिकांचा योजनेत समावेश

■ मुंबई (दै. संध्या)

राज्यातील शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्ती, अवकाळी पाऊस, दुष्काळ व इतर प्रतिकूल परिस्थितीमुळे होणाऱ्या उत्पादनातील नुकसानीपासून आर्थिक संरक्षण मिळावे, या उद्देशाने राज्य शासनाने सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजना लागू केली आहे. तेंव्हा ३१ जुलैपूर्वी शेतकऱ्यांनी नोंदणी करावी असे आवाहन राज्याचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी केले. यासंदर्भातील सुधारित शासन निर्णय जारी करण्यात आला आहे.

सुधारित योजनेनुसार अधिसूचित महसूल मंडळामध्ये अधिसूचित पिकाचे चालू वर्षातील सरासरी उत्पादन हे उंबरठा उत्पादनापेक्षा कमी आल्यास संबंधित शेतकऱ्यांना विमा नुकसानभरपाईचा लाभ मिळणार आहे. खरीप हंगामासाठी भात, ज्वारी, बाजरी, नागली, मूग, उडीद, तूर, मका, भुईमूग, तीळ, कारळे, सोयाबीन, कापूस आणि खरीप कांदा या एकूण १४ पिकांचा योजनेत समावेश करण्यात आला आहे.



कृषी मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले की, बदलत्या हवामानामुळे शेतीपुढील जोखीम वाढत आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांच्या उत्पादनाला आर्थिक संरक्षण देण्यासाठी पीक विमा योजना अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे. त्यामुळे राज्यातील पात्र शेतकऱ्यांनी या योजनेत मोठ्या प्रमाणावर सहभागी होऊन आपल्या पिकांचे संरक्षण करावे,असे आवाहन त्यांनी केले. या योजनेत सहभागी होण्यासाठी अन्नधान्य, कडधान्य व तेलबिया पिकांसाठी विमा संरक्षित रकमेच्या केवळ २ टक्के विमा हप्ता भरावा लागणार असून, कापूस आणि कांदा या व्यापारी पिकांसाठी विमा संरक्षित रकमेच्या ५ टक्के हप्ता भरावा लागणार आहे. योजनेत सहभागी होण्यासाठी ३१ जुलै २०२६ ही अंतिम मुदत निश्चित करण्यात आली आहे. शेतकरी National Crop Insurance Portal (NCIP) वर ऑनलाइन अर्ज करून सहभाग नोंदवू शकतात. तसेच बँका, कॉमन सर्व्हिस सेंटर (CSC) किंवा स्वतः ऑनलाइन अर्ज भरूनही योजनेचा लाभ घेता येणार आहे. योजनेत सहभागी होण्यासाठी अॅग्रीस्टॅक नोंदणी क्रमांक बंधनकारक करण्यात आला असून, शेतकऱ्यांकडे जमिनीची कागदपत्रे, पीक लागवड घोषणापत्र, आधार क्रमांक तसेच आधारशी संलग्न बँक खाते असणे आवश्यक आहे. याशिवाय शेतकऱ्यांनी आपल्या पिकाचा डिजिटल क्रॉप सर्व्हे करणे अनिवार्य आहे. डिजिटल क्रॉप सर्व्हेमध्ये नोंदविलेल्या पिकाची माहिती आणि विम्यासाठी अर्जात नमूद केलेल्या पिकामध्ये तफावत आढळल्यास डिजिटल क्रॉप सर्व्हेतील नोंद अंतिम मानली जाईल आणि तफावत सिद्ध झाल्यास संबंधित विमा अर्ज रद्द करण्यात येईल याची शेतकऱ्यांनी नोंद घ्यायची आहे.

योजनेचा गैरफायदा घेण्यासाठी चुकीची अथवा खोटी माहिती देऊ नये. तसे झाल्याचे आढळल्यास संबंधित शेतकऱ्यांना पुढील पाच वर्षे कृषी विभागाच्या विविध योजनांपासून वंचित राहावे लागणार असल्याचा इशाराही कृषी मंत्र्यांनी दिला आहे. योजनेत सहभागी होण्यासाठी संबंधित पिकाखाली किमान ०.१० हेक्टर क्षेत्र असणे आवश्यक आहे. योजनेसंदर्भात कोणतीही अडचण अथवा अधिक माहिती आवश्यक असल्यास संबंधित विमा कंपनी, तालुका कृषी अधिकारी कार्यालय किंवा १४४४७ या हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधता येईल.

हवामान विभागाने चालू वर्षासाठी पावसाबाबत व्यक्त केलेल्या अंदाजाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी आर्थिक जोखीम कमी करण्यासाठी प्रधानमंत्री पीक विमा योजनेत सहभागी होणे अत्यंत आवश्यक असल्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी नमूद केले. राज्यातील सर्व पात्र शेतकऱ्यांनी अंतिम मुदतीपूर्वी विमा योजनेत सहभाग नोंदवून या महत्त्वपूर्ण योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

## पावसाळ्यापूर्वी सर्व झाडांचे ऑडिट करा, शिवसेना सचिव शायना एन सी यांचा इशारा

■ मुंबई (दै. संध्या)

चेंबूर येथील रोड नं. 11 वर 30 जून रोजी शालेय बसवर 60-70 वर्षे जुने पिंपळाचे झाड कोसळून 11 वर्षीय विहान श्रीवास्तव विद्यार्थ्याचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेनंतर पालिकेच्या निष्काळजीपणावर शिवसेना पक्षाने तीव्र आक्षेप नोंदवला आहे.पालिकेने सर्व झाडांचे 'ऑडिट झाले' हे सांगितले परंतु ढोंगीपणाचे लक्षण असून अजूनही मुंबईतील संपूर्ण झाडांचे ऑडिट झालेले नाही. तरी महापालिकेने मुंबईतील सर्व झाडांचे त्वरित ऑडिट करावे असा जाहीर इशारा शिवसेना सचिव शायना एन सी यांनी दिला.

चेंबूर दुर्घटनेनंतर बीएमसीने दिलेला खुलासा म्हणजे जबाबदारी झटकण्याचा एक प्रकार आहे. त्यासाठी "आम्ही तपासणी केली असता 12 मे 2026 रोजी झाड 'निरोगी' असल्याचा अहवाल आणि 29 मे रोजी छाटणी केली, असे बीएमसी मात्र, रोड नं. 11 वरील मुळांना एप्रिल 2025 व जानेवारी 2026 मध्ये रस्ता काँक्रीटीकरणाच्या कामामुळे मोठे नुकसान झाल्याचे बीएमसीने स्वतःच्या चौकशीतून समोर आले आहे.

यासाठी 3 अधिकाऱ्यांना निलंबितही केले गेले आहे."झाड पडणे निसर्गिक आहे" पण तज्ञांचे म्हणणे आहे की, मुसळधार पाऊस हे फक्त निमित्त आहे. खरे कारण आहे जुनी पोखरलेली झाडे आणि मुळांची निगा न राखणे हे आहे. आम्ही या पडझड होणाऱ्या झाडाबाबत तक्रारी केल्या होत्या, पण महापालिकेने झाडांची पाहणी केली नाही. यासाठी आम्ही पावसाळ्यापूर्वी मुंबईतील सर्व धोकादायक झाडांची तृतीयपक्षीय तज्ञांमार्फत स्वतंत्र ऑडिट केले जावे. तसेच केवळ 'बाह्य तपासणी' नको, तर मुळांची सोनोग्राफी तपासणी बंधनकारक करावी.

त्याचप्रमाणे महापालिकेच्या रस्ते विभाग व गार्डन विभाग यांच्यातील समन्वयाचा अभाव ही दुर्घटना घडण्याचे मुख्य कारण आहे. अशी माहिती आमदार तुकाराम काते यांनी दिली. नागरिकांच्या झाडांबाबतच्या तक्रारींकडे 'दुर्लक्ष' न होता, 72 तासांच्या आत कार्यवाही होईल अशी यंत्रणा महापालिकेने कार्यान्वित करावी.

तसेच मृत विहानच्या कुटुंबाला ₹2.5 लाखांची मदत पुरेशी नाही. तर पालिकेने नैतिक जबाबदारी घेऊन किमान रुपये 10 लाख नुकसान भरपाई द्यावी. मुंबईकरांचे जीव हे बीएमसीच्या 'फायली' मधील आकड्यांपेक्षा अधिक महत्त्वाचे आहेत.बीएमसीने या सर्व प्रकारावर त्वरित कारवाई न केल्यास शिवसेना रस्त्यावर उतरून आंदोलन करेल, असा इशारा शिवसेना राष्ट्रीय सचिव शायना एन सी यांनी दिला. दिनांक 06 जुलै 2026 रोजी महापालिका आयुक्त यांना शिवसेना पक्षातर्फे याबाबतचे निवेदन देण्यात येणार आहे.

## रत्नागिरीतील शासकीय रुग्णालयांच्या विकासाला गती - आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर

■ मुंबई (दै. संध्या)

रत्नागिरी जिल्ह्यातील खेड तालुक्यातील मौजे वावे, चिपळूण तालुक्यातील मौजे रामपूर तसेच गुहागर तालुक्यातील गुहागर व आबलोली येथील शासकीय आरोग्य संस्थांच्या विकासकामांना गती देण्यासाठी आवश्यक प्रस्ताव तातडीने सादर करावेत, तसेच बांधकाम, श्रेणीवर्धन, पदनिर्मिती, वैद्यकीय उपकरणांची उपलब्धता आणि इतर मूलभूत सुविधांबाबत तातडीने कार्यवाही करावी, असे निर्देश सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले.



विधान भवन येथे निर्देश सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री आबिटकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत रत्नागिरी जिल्ह्यातील विविध शासकीय रुग्णालयांच्या प्रलंबित प्रश्नांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी आमदार भास्कर जाधव, आरोग्य विभागाचे आयुक्त संजय काटकर, आरोग्य सेवा संचालक डॉ. विजय कंदेवाड, सहसंचालक डॉ. सुनीता गोलाईत, सहसंचालक राजेंद्र भालेराव तसेच आरोग्य विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. दूरदृश्य प्रणालीद्वारे रत्नागिरीचे जिल्हा शल्यचिकित्सक आणि कोल्हापूर विभागाचे आरोग्य उपसंचालक सहभागी झाले होते. बैठकीत खेड तालुक्यातील मौजे वावे येथील शासकीय रुग्णालयाच्या नवीन इमारतीसाठी आवश्यक अंदाजपत्रक, निधी मंजुरी, वैद्यकीय उपकरणे, उपलब्ध जागा आणि इतर पायाभूत सुविधांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. या कामासाठी आवश्यक प्रस्ताव तातडीने सादर करण्याचे निर्देश आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले. चिपळूण तालुक्यातील मौजे रामपूर येथील श्रेणीवर्धित प्राथमिक आरोग्य केंद्राच्या नवीन इमारतीसाठी किमान ६१ गुंठे जागेची आवश्यकता असून सध्या केवळ ३३ गुंठे जागा उपलब्ध आहे. ग्रामपंचायतीच्या मालकीची ४० गुंठे जागा उपलब्ध करून नवीन इमारत उभारण्याबाबत ग्रामपंचायतीची मदत घ्यावी असे त्यांनी सांगितले. गुहागर प्राथमिक आरोग्य केंद्रात जुन्या इमारतीच्या जागी नवीन इमारतीचा प्रस्ताव सादर करावा. तसेच आरोग्य सेवा संचालक आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांनी संबंधित आरोग्य संस्थांना प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी करावी व रत्नागिरी जिल्ह्यातील आरोग्य संस्थांशी संबंधित प्रलंबित प्रश्नांचा विचार करून आवश्यक कामांसाठी विशेष बाब म्हणून मुख्यमंत्री यांच्याकडे प्रस्ताव सादर करण्यात यावा, असे निर्देशही मंत्री आबिटकर यांनी दिले.

आरोग्य मंत्री आबिटकर यांनी सांगितले की, कोकणातील नागरिकांना दर्जेदार, सुलभ आणि वेळेत आरोग्य सेवा उपलब्ध व्हावी, यासाठी राज्य शासन कटिबद्ध असून रत्नागिरी जिल्ह्यातील आवश्यक आरोग्य पायाभूत सुविधा बळकट करण्यासाठी सर्व संबंधित प्रस्तावांना प्राधान्याने गती दिली जाईल.

# ई-स्पोर्ट्स वर्ल्ड कप २०२६ च्या माध्यमातून महाराष्ट्र डिजिटल क्रिएटिव्ह अर्थव्यवस्थेचे नेतृत्व करेल – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

■ मुंबई (दै. संध्या)


पॅरिस येथे होणाऱ्या 'ई-स्पोर्ट्स वर्ल्ड कप २०२६' या गेमिंग विश्वाच्या ऑलिम्पिक स्पर्धेसाठी 'इंडिया रायझिंग' आणि 'जिओ ब्लास्ट'च्या माध्यमातून भारताचे दरवाजे खुले होत आहेत. महाराष्ट्रातील आणि देशातील प्रत्येक गुणवंत युवा गेमरला आता जागतिक स्तरावर आपल्या कौशल्याचा ठसा उमटविण्याची संधी उपलब्ध झाली असून, हा भारताच्या डिजिटल क्रिएटिव्ह अर्थव्यवस्थेच्या वाटचालीतील ऐतिहासिक टप्पा असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

जिओ वर्ल्ड कन्व्हेंशन सेंटर, बीकेसी, मुंबई येथे आयोजित 'इंडिया रायझिंग : रोड टू ई-स्पोर्ट्स वर्ल्ड कप २०२६' या कार्यक्रमात मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ पी अन्बळगन, जिओ ब्लास्टचे मुख्य कार्यकारी अधिकारी चार्ली कॉड्रे, ईस्पोर्ट्स वर्ल्ड कप फाउंडेशनचे प्रतिनिधी जेम्स कनिंगहॅम, विविध ई-स्पोर्ट्स संघटनांचे प्रतिनिधी, उद्योग क्षेत्रातील मान्यवर तसेच देशभरातील गेमर्स मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, मुंबईने चित्रपट आणि मनोरंजन उद्योगाच्या माध्यमातून 'स्वप्ननगरी' म्हणून जागतिक ओळख निर्माण केली आहे. आता अॅनिमेशन, व्हिज्युअल इफेक्ट्स, गेमिंग, कॉमिक्स आणि एक्सटेंडेड रिअॅलिटी (एव्हीजीसी-एक्सआर) या नव्या सर्जनशील उद्योगांमध्येही महाराष्ट्र देशाचे नेतृत्व करण्यासाठी सज्ज झाला आहे. माहिती तंत्रज्ञान, डिजिटल कौशल्य, उत्कृष्ट शैक्षणिक संस्था, चित्रपटसृष्टी, ओटीटी निर्मिती, पोस्ट-प्रोडक्शन सुविधा आणि सक्षम पायाभूत व्यवस्था यांमुळे महाराष्ट्राने या क्षेत्रात भक्कम परिसंस्था उभी केली आहे.

गेमिंग उद्योगाच्या वाढत्या सामर्थ्याकडे लक्ष वेधताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, जागतिक स्तरावर गेमिंग उद्योगाचा वार्षिक महसूल चित्रपट आणि संगीत उद्योगाच्या एकत्रित महसुलापेक्षाही अधिक झाला आहे. भारतात ५० कोटींहून अधिक सक्रिय गेमर्स असून देशांतर्गत गेमिंग उद्योगाची व्याप्ती सुमारे ४० हजार कोटी रुपयांपर्यंत पोहोचली आहे. त्यामुळे गेमिंग हा केवळ मनोरंजनाचा विषय नसून रोजगार, नवोन्मेष, उद्योजकता आणि डिजिटल अर्थव्यवस्थेचा प्रभावी आधारस्तंभ बनत आहे. परवडणारा डेटा, वेगवान इंटरनेट, युपीआय व्यवहार व्यवस्था आणि अत्याधुनिक डिजिटल तंत्रज्ञानामुळे भारतात एव्हीजीसी-एक्सआर क्षेत्र झपाट्याने विकसित होत आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, व्हर्च्युअल प्रोडक्शन आणि इमर्सिव्ह तंत्रज्ञानाच्या साहाय्याने भविष्यातील मनोरंजन आणि डिजिटल कंटेंट उद्योगाची दिशा निश्चित होत आहे.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की,



व्यापक एव्हीजीसी-एक्सआर धोरण जाहीर करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. या धोरणांतर्गत ३,२६८ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून ५० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक आकर्षित करणे आणि दोन लाख रोजगारनिर्मितीचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. या क्षेत्राला उद्योग आणि पायाभूत सुविधा क्षेत्राचा दर्जा देण्यात आला असून राज्यभरात १२ एव्हीजीसी पार्क विकसित करण्यात येत आहेत.

मुंबई, नवी मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक आणि छत्रपती संभाजीनगर येथे अत्याधुनिक व्हर्च्युअल प्रोडक्शन व कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित रेंडरिंग सुविधा उभारण्यात येणार असून नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरात ५० एकर क्षेत्रावर जागतिक दर्जाचे कंटेंट क्रिएटर्स संकुल उभारण्यात येणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या पुढाकारातून मुंबईमध्ये 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ क्रिएटिव्ह टेक्नॉलॉजीज' स्थापन होत असल्याचा उल्लेख करून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, ही संस्था देशाच्या क्रिएटिव्ह आणि ऑरेंज इकॉनॉमीला नवी दिशा देणारी ठरेल आणि जागतिक दर्जाचे मनुष्यबळ घडविण्यात महत्त्वाची भूमिका बजावेल.

ई-स्पोर्ट्स वर्ल्ड कप २०२६ संदर्भात मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, 'इंडिया रायझिंग' आणि 'जिओ ब्लास्ट' या उपक्रमांमुळे भारतातील प्रत्येक युवा गेमरला जागतिक स्पर्धेत सहभागी होण्याचा मार्ग उपलब्ध झाला आहे. महाराष्ट्रातील शहरांसह ग्रामीण भागातील प्रतिभावान युवकांनाही आता जागतिक स्तरावर पोहोचण्याची समान संधी मिळणार आहे. त्यामुळे भारताची गेमिंग प्रतिभा जागतिक मंचावर अधिक प्रभावीपणे झळकणार आहे.

या उपक्रमात सुमारे ५० हजार स्पर्धक, पाच हजार प्रत्यक्ष प्रेक्षक, आठ कोटी डिजिटल प्रेक्षक आणि २० कोटींहून अधिक डिजिटल इम्प्रेशन्स अपेक्षित असून जिओच्या ६० कोटींहून अधिक वापरकर्त्यांपर्यंत या अभियानाची पोहोच होणार असल्याचे त्यांनी सांगितले. भारताच्या इतिहासातील सर्वात व्यापक आणि प्रभावी ई-स्पोर्ट्स अभियान म्हणून 'इंडिया रायझिंग'ची नोंद होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

गेमिंग उद्योग भविष्यातील जागतिक अर्थव्यवस्थेचा महत्त्वपूर्ण घटक ठरणार असून महाराष्ट्रातील युवा शक्ती, नवोन्मेष आणि सर्जनशीलतेच्या बळावर राज्य जागतिक गेमिंग आणि डिजिटल कंटेंट उद्योगाचे नेतृत्व करेल, असा विश्वास व्यक्त करत मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, "चित्रपट आपल्याला स्वप्नांचे जग दाखवतात; परंतु गेमिंग आपल्याला त्या स्वप्नांचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याची आणि स्वतः त्या विश्वाचा नायक बनण्याची संधी उपलब्ध करून देते."

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल आयोजक, जिओ ब्लास्ट, उद्योग क्षेत्रातील सहभागी संस्था तसेच सर्व स्पर्धकांचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी अभिनंदन केले. महाराष्ट्र शासन एव्हीजीसी-एक्सआर, गेमिंग आणि ई-स्पोर्ट्स क्षेत्राला सर्वतोपरी पाठबळ देत राज्याला डिजिटल क्रिएटिव्ह अर्थव्यवस्थेचे जागतिक केंद्र बनविण्यास कटिबद्ध असल्याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

## थोडक्यात पण महत्वाचे...




### सासवडच्या वाघीरे विद्यालयाचे 11 विद्यार्थी ठरले शिष्यवृत्तीसाठी पात्र

सासवड (दैनिक संध्या) : महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने घेतलेल्या इयत्ता पाचवी व आठवीच्या विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून सासवड येथील एम ई एस संस्थेच्या वाघीरे विद्यालयाने घवघवीत यश प्राप्त केले आहे. पाचवीतील आठ तर आठवी मधील तीन विद्यार्थी शिष्यवृत्ती साठी पात्र ठरले असुन पाचवीचा वेदांत साबळे हा ३०० पैकी २८४ गुण मिळवून राज्यात पाचवा आला आहे. या परीक्षेत पाचवी इयत्तेमधुन ५१ तर आठवी मधून ८ विद्यार्थी पात्र झाले आहेत. पाचवीचे गुणवंत विद्यार्थी वेदांत साबळे, अनण्या भिसे, पूर्वा रासकर, सार्थ शिंदे, आरुष राऊत, अनुराज चाचर, शुभ्रा जगताप व स्वराज पवार तर आठवीचे सिद्धी गजरे, अनघा जगताप व सर्वेश लवांडे.शाला समितीचे अध्यक्ष राहुल मिरासदार, महामात्र सुधीर भोसले, मुख्याध्यापक राजेंद्र कांबळे, उपमुख्याध्यापक शंतनू सुरवसे, पर्यवेक्षिका अर्चना लडकत यांसह सर्व शिक्षक वृंदाने या गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे. शिवहार लहाने, आप्पा कोकरे, गणेश पाठक, प्रज्ञा पोटगावकर, मंगल कोकरे, प्रमोद ठुबे दिपाली लांडगे व गौरी ढगे या शिक्षकांचे या मुलांना विशेष मार्गदर्शन लाभले होते. विदयार्थ्यांच्या या यशाबद्दल सर्व थरातुन त्यांचे कौतुक होत आहे. स्व एकनाथ काका जगताप प्रतिष्ठानने विद्यालयात जाऊन गुणवंत विद्यार्थ्यांचे वही पेन व गुलाब पुष्प देवून अभिनंदन केले आहे. प्रतिष्ठानचे अध्यक्ष संतोष जगताप व सचिव हेमंत ताकवले यावेळी उपस्थित होते.



### संत ज्ञानेश्वर महाराज मंदिरातील सुरक्षा व्यवस्थेची पोलिस आयुक्तांकडून पाहणी

आळंदी (दैनिक संध्या) : संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांच्या आषाढी वारी पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवडचे पोलिस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी शुक्रवारी संत ज्ञानेश्वर महाराज समाधी मंदिर परिसराला भेट देऊन सुरक्षा व्यवस्थेचा सविस्तर आढावा घेतला. मंदिर परिसर, दर्शन रांग, प्रवेश-निर्गमन मार्ग तसेच वारकऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी करण्यात आलेल्या उपाययोजनांची त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती घेतली. यावेळी संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानच्या वतीने पोलिस आयुक्त विनयकुमार चौबे यांचा शाल व श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला. या प्रसंगी संस्थानचे प्रमुख विश्वस्त डॉ.भावार्थ देखणे, पालखी सोहळा प्रमुख ॲड. राजेंद्र उमाप, विश्वस्त योगी निरंजननाथ, चैतन्य लोंढे (कबीरबुवा), पुरुषोत्तम पाटील, आळंदी नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे तसेच पोलिस विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. आषाढी वारीदरम्यान लाखो वारकरी आळंदीत दाखल होणार असल्याने कायदा व सुव्यवस्था, वाहतूक नियंत्रण आणि भाविकांच्या सुरक्षिततेसाठी पोलिस प्रशासनाने व्यापक नियोजन केले असून त्याचाच एक भाग म्हणून ही प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली.

### 'राम कृष्ण हरी'च्या गजरात पिंपळवंडी येथून दिंडीचे रविवारी प्रस्थान

नारायणगाव (दैनिक संध्या) : संत सावळेरामबाबा पिंपळवंडीकर व संत सहादुबाबा वायकर गुंजाळवाडीकर यांच्या पालखी सोहळ्याचे रविवारी पिंपळवंडी येथून पंढरपूरकडे प्रस्थान होणार आहे. दिंडी सोहळा प्रमुख हभप दत्तामहाराज वाघ आणि शांताराममहाराज सोनवणे यांनी याविषयी माहिती दिली. हभप सखाराम चाळक गुरुजी, चिमाजीबुवा काचळे व रामभाऊबाबा वामन यांनी या दिंडी सोहळ्याची परंपरा सुरू केली होती. यंदाचे या सोहळ्याचे २५ वे वर्ष आहे. या निमित्ताने पंढरपूर येथील मुक्कामाच्या ठिकाणी अखंड हरीनाम सप्ताह आणि कीर्तन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा दिंडी सोहळा पिंपळवंडी येथून निघून निमगावसावा, जांबुत, शिरूर, गोलेगाव, निर्वी, इनामगाव, तांदळी, काष्टी, निमगावखलू, दौंड, कुरकुंभ आणि डाळज अशा विविध मार्गांनी मार्गक्रमण करणार आहे.

# विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला संस्कार, संस्कृती आणि सामाजिक मूल्यांची जोड देणे आवश्यक - महापौर नागपुरे

पुणे (दै. संध्या)



"विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला संस्कार, संस्कृती आणि सामाजिक मूल्यांची जोड देणारे उपक्रम ही काळाची गरज आहे. 'कलावारी'च्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये सेवाभाव, स्वच्छतेची जाणीव, पर्यावरण संवर्धनाची भावना आणि महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वारशाविषयी अभिमान निर्माण होत आहे. अशा उपक्रमांमधून संवेदनशील, जबाबदार आणि सुसंस्कृत नागरिक घडविण्यास निश्चितच हातभार लागेल," असे महापौर मंजुषा नागपुरे म्हणाल्या.

पुणे महानगरपालिकेच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या 'पुणे प्रथम – सेवावारी २०२६' अभियानांतर्गत 'कलावारी' चित्रकला स्पर्धा राबविण्यात येत आहे. यावेळी विविध शाळेतील विद्यार्थ्यांशी संवाद साधताना महापौर नागपुरे बोलत होत्या.

पुणे महानगरपालिकेच्या वतीने महापौर मंजुषा नागपुरे यांच्या संकल्पनेत राबविण्यात येत असलेल्या 'पुणे प्रथम – सेवावारी २०२६' अभियानांतर्गत शालेय विद्यार्थ्यांसाठी आयोजित 'कलावारी' चित्रकला स्पर्धेला शहरभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या स्पर्धेत पुणे शहरातील ४ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवत महाराष्ट्राची संतपरंपरा, भक्ती, संस्कृती आणि सामाजिक मूल्यांचे प्रभावी चित्रण केले.

स्पर्धेच्या निमित्ताने महापौर मंजुषा नागपुरे यांनी शहरातील विविध शाळांना भेट देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांनी साकारलेल्या कलाकृतींचे कौतुक करत त्यांच्या सृजनशीलतेला प्रोत्साहन दिले. विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेतून विठ्ठल-रखुमाई, पालखी सोहळा, दिंडी, संतपरंपरा, स्वच्छता, पर्यावरण संवर्धन तसेच 'सेवावारी'चा संदेश अत्यंत प्रभावीपणे चित्रांमधून साकारला. प्रत्येक चित्रातून भक्ती, संस्कृती, सामाजिक जाणीव आणि पर्यावरणाबद्दलची संवेदनशीलता प्रकर्षाने दिसून आली.

या स्पर्धेविषयी बोलताना आयुक्त डॉ. नवल किशोर राम म्हणाले की, पुणे प्रथम – सेवावारी २०२६' अभियानातील 'कलावारी' हा उपक्रम केवळ चित्रकला स्पर्धा नसून विद्यार्थ्यांमध्ये संस्कार, सामाजिक उत्तरदायित्व आणि सांस्कृतिक जाणीव रुजविण्याचा प्रभावी प्रयत्न आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून स्पर्धेतील सर्व सहभागी विद्यार्थ्यांना डिजिटल सहभाग प्रमाणपत्र उपलब्ध करून देण्यात आले आहे. अशा उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेला व्यासपीठ मिळण्याबरोबरच स्वच्छता, पर्यावरण संवर्धन आणि सेवाभावाची मूल्ये समाजात अधिक दृढ करण्यासाठी महानगरपालिका सातत्याने कार्यरत आहे.

'पुणे प्रथम – सेवावारी २०२६' अंतर्गत आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना आपली कलात्मक अभिव्यक्ती मांडण्याची संधी मिळाली, तसेच महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेची ओळख नव्या पिढीपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्याचे कार्यही साध्य झाले. स्पर्धेत विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवत सामाजिक विषयांप्रती असलेली आपली जागरूकता आणि कलात्मक दृष्टीकोन प्रभावीपणे व्यक्त केला.

स्पर्धेतील उत्कृष्ट कलाकृतींच्या आधारे प्रथम, द्वितीय, तृतीय तसेच उत्तेजनार्थ क्रमांक प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरव शालेय स्तरावर करण्यात येणार आहे. याशिवाय स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना त्यांच्या सहभागाची नोंद म्हणून डिजिटल सहभाग प्रमाणपत्र उपलब्ध करून देण्यात आले. यासाठी आपण काढलेले चित्र हे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी क़्युआर कोड स्कॅन करा व आपण काढलेले चित्र अपलोड करून डिजिटल सहभाग प्रमाणपत्र मिळावा. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन मिळण्याबरोबरच त्यांच्या सहभागाची अधिकृत नोंद महानगरपालिकेने केली आहे.

## कदमवाकवस्ती पालखी तळाजवळ पाण्याच्या डबक्यात पडून चिमुकल्याचा मृत्यू; ठेकेदारावर गुन्हा दाखल

लोणी काळभोर (दै. संध्या)

कदमवाकवस्ती (ता. हवेली) येथील पालखी तळाच्या परिसरात खेळताना पाण्याच्या डबक्यात पडून सोहम लखन कसबे (वय १ वर्ष १० महिने) या चिमुकल्याचा बुडून दुर्दैवी मृत्यू झाला होता. ही घटना मंगळवारी ( दि.३०) सकाळी १० वाजण्याच्या सुमारास उघडकीस आली असून या घटनेमुळे संपूर्ण परिसरात तीव्र हळहळ व्यक्त केली जात आहे. घराबाहेर खेळत असताना सोहम सुमारे चार फूट खोल चारीत पडून बुडून रुग्णालयात नेण्यापूर्वीच त्याचा मृत्यू झाला. या घटनेशी संबंधित सर्व जबाबदारांवर कारवाई करण्याची मागणी पुणे जिल्हा लहुजी शक्ती सेना कोर कमिटी अध्यक्ष विजय सकट व राष्ट्रीय मांग गारुडी क्रांती सेनेचे अध्यक्ष विजय बोडके यांनी केली आहे. लोणी काळभोर पोलीस ठाण्यात ठेकेदारविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर २७ जून २०२६ रोजी पालखी तळ परिसराची पाहणी व आढावा बैठक पार पडली होती. या बैठकीला स्थानिक लोकप्रतिनिधी व विविध शासकीय विभागांचे अधिकारी उपस्थित होते. त्यानंतर परिसरात मुरूम-मातीच्या भरावाचे सपाटीकरण करण्यात आले. मात्र, त्या ठिकाणी साचलेल्या पाण्यामुळे ३० जून २०२६ रोजी एका निष्पाप चिमुकल्याचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली.

या घटनेबाबत विजय बोडके, विजय सकट, विजय राखपसरे यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निष्पक्ष चौकशीची मागणी केली असून, संबंधित कामात किंवा देखरेखीत निष्काळजीपणा आढळल्यास दोषींवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे. तसेच पालखी तळ परिसरातील साचलेले पाणी, खड्डे व धोकादायक ठिकाणे तातडीने सुरक्षित करून भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याचे आवाहनही त्यांनी केले आहे.

दरम्यान, या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून, पालखी मार्गावरील सुरक्षेच्या उपाययोजनांबाबत प्रश्न उपस्थित केले जात आहेत.



**जेजुरीच्या खंडोबा मंदिराचे पाऊसाच्या पाण्यातील प्रतिबिंब**

महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या जेजुरी गडावरील खंडोबा देवाच्या मंदिर आवारात पाऊस पडल्यानंतर पहाटेच्या वेळी या पावसाच्या पाण्यात मंदिराचे विलोभनीय प्रतिबिंब छाया चित्रकार महेश शिंदे यांनी टिपले.

## राष्ट्रीय पल्स पोलिओ अभियानात स्वच्छता निरीक्षक पदविका अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांचे योगदान

पुणे (दै. संध्या)

भारत सरकार व राज्य शासनाच्या वतीने दिनांक २८ जून २०२६ रोजी संपूर्ण देशभर राष्ट्रीय पल्स पोलिओ अभियान उत्साहात व यशस्वीरीत्या राबविण्यात आले. या अभियानांतर्गत पुणे महानगरपालिका आरोग्य विभागाच्या वतीने जनता वसाहत दवाखाना, सहकारनगर–पर्वती विभाग येथे व्यापक प्रमाणात पोलिओ लसीकरण अभियान आयोजित करण्यात आले.

या अभियानात ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट, कोथरूड, पुणे येथील स्वच्छता निरीक्षक पदविका अभ्यासक्रमाच्या एकूण ७० विद्यार्थ्यांनी स्वयंसेवक म्हणून सहभागी होऊन लसीकरणाची विविध कार्ये करून योगदान दिले. विद्यार्थ्यांनी विविध लसीकरण केंद्रांवर नियोजन, जनजागृती, लाभार्थी नोंदणी, बालकांना पोलिओचे दोन थेंब पाजण्यास सहाय्य तसेच नागरिकांना मार्गदर्शन करण्याचे कार्य इ. कामे अत्यंत जबाबदारीने पार पाडली.

पुणे महानगरपालिका आरोग्य विभागामार्फत एकूण ३६ लसीकरण बूथ कार्यान्वित करण्यात आले होते. या अभियानात ११४ आरोग्य कर्मचारी, आशा स्वयंसेविका , अंगणवाडी सेविका तसेच इतर आरोग्य कर्मचाऱ्यांनी समन्वयाने उत्कृष्ट कार्य करून मोहिमेच्या यशात मोलाचे योगदान दिले.



दिवसभरात एकूण ३५१९ बालकांना पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब पाजण्यात आले, ज्यामुळे बालकांचे पोलिओपासून संरक्षण करण्याच्या राष्ट्रीय उद्दिष्टाला मोठी मदत झाली.

हे अभियान डॉ. तहूरा शेख, आरोग्य अधिकारी, पुणे महानगरपालिका, जनता वसाहत दवाखाना तसेच डॉ गायकवाड एस. जी (प्राचार्य, स्वच्छता निरीक्षक पदविका अभ्यासक्रम, ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट, पुणे) यांच्या मार्गदर्शनाखाली अत्यंत नियोजनबद्ध आणि यशस्वीरीत्या पार पडले. राष्ट्रीय पल्स पोलिओ अभियानात सहभागी झालेल्या सर्व आरोग्य अधिकारी, आरोग्य कर्मचारी, आशा स्वयंसेविका, अंगणवाडी सेविका, स्वच्छता निरीक्षक पदविका अभ्यासक्रमाचे विद्यार्थी तसेच सर्व सहकार्य करणाऱ्या व्यक्तींचे दगा मोरे (विभागीय संचालक , ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट , पुणे) यांनी मनःपूर्वक अभिनंदन केले आहे. अशा सामूहिक प्रयत्नांमुळे "पोलिओमुक्त भारत" हे राष्ट्रीय स्वप्न पूर्ण होण्यास मोठा हातभार लाभला आहे. सदर अभियाना दरम्यान मा. वृषाली आनंद रिठे (नगरसेविका) तसेच प्रियाताई गदादे (नगरसेविका) यांनी भेट दिली संस्थेच्या सर्व विद्यार्थ्यांचे त्यांनी खूप कौतुक केले.

# विशेष मुलांच्या आयुष्यात आशेचा किरण ठरत आहे ‘साहस फाउंडेशन’

पुणे (दै. संध्या)



विशेष गरजा असलेल्या मुलांकडे समाजात अनेकदा दयेच्या भावनेने पाहिले जाते. मात्र, योग्य प्रशिक्षण, प्रोत्साहन आणि संधी मिळाल्यास ही मुलेही स्वावलंबी व आत्मविश्वासपूर्ण जीवन जगू शकतात, हा विश्वास प्रत्यक्ष कृतीतून सिद्ध करणारे साहस फाउंडेशन गेल्या नऊ वर्षांपासून विशेष मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी उल्लेखनीय कार्य करत आहे.

सन २०१७ मध्ये सामाजिक कार्यकर्ते सतीश खराडे यांनी स्थापन केलेली साहस फाउंडेशन ही पूर्णपणे ना-नफा तत्त्वावर कार्य करणारी संस्था असून पुणे व मुंबई परिसरातील शेकडो विशेष मुलांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणण्याचे काम करत आहे. संस्थेचे मुख्य उद्दिष्ट विशेष मुलांना शारीरिक, मानसिक, सामाजिक आणि जीवनकौशल्यांच्या माध्यमातून अधिक सक्षम व स्वावलंबी बनविणे हे आहे.

संस्थेची ३५ सदस्यांची समर्पित टीम विशेष मुलांच्या घरी जाऊन त्यांना शारीरिक तंदुरुस्ती, शरीराचा समन्वय, संतुलन, क्रीडा कौशल्ये, दैनंदिन जीवनातील स्वावलंबन तसेच सामाजिक कौशल्यांचा विकास यासाठी नियमित प्रशिक्षण देते. प्रत्येक मुलाने भविष्यात शक्य तितकी स्वतःची कामे स्वतः करण्यास सक्षम व्हावे आणि पालकांवरील अवलंबित्व कमी व्हावे, या उद्देशाने संस्था सातत्याने कार्यरत आहे.

विशेष मुलांमध्ये आत्मविश्वास वाढविण्यासाठी साहस फाउंडेशनतर्फे ट्रेकिंग, फील्ड ट्रिप, साहसी उपक्रम, क्रीडा स्पर्धा, समूह उपक्रम आणि विविध कौशल्यविकास प्रशिक्षण कार्यक्रमांचे नियमित आयोजन केले जाते. सध्या संस्थेत १०० हून अधिक विद्यार्थी नियमित प्रशिक्षण घेत असून ५०० पेक्षा अधिक कुटुंबांना संस्थेने मार्गदर्शन, समुपदेशन आणि विविध प्रकारचा आधार दिला आहे.

या सामाजिक उपक्रमात सहसंचालक मयूर लोणकर, तांत्रिक प्रमुख एकनाथ पाडेकर, सचिव वैभव गायकवाड, विशेष शिक्षिका सोनाली अहिरे, सुचेता पवार तसेच साहस फाउंडेशनची संपूर्ण टीम निस्वार्थ भावनेने योगदान देत आहे.

संस्थापक व संचालक सतीश खराडे यांनी सांगितले की, "विशेष मुलांमध्ये अमर्याद क्षमता आहे. त्यांना केवळ योग्य दिशा, सातत्यपूर्ण प्रशिक्षण आणि समाजाची स्वीकारार्हता मिळण्याची गरज आहे. प्रत्येक विशेष मुलाला सन्मानाने, स्वाभिमानाने आणि स्वावलंबीपणे जगता यावे, हेच साहस फाउंडेशनचे ध्येय असून त्यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्नशील आहोत."

## यशाच्या शिखरावर समर्थ कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स; विद्यापीठ परीक्षेत विद्यार्थ्यांची दैदिप्यमान भरारी

जुन्नर (दै. संध्या)

सातत्यपूर्ण परिश्रम, गुणवत्तापूर्ण अध्यापन आणि विद्यार्थ्यांच्या जिद्दीच्या बळावर समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स बेल्हे महाविद्यालयाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परीक्षेत पुन्हा एकदा उज्ज्वल यशाची सुवर्ण परंपरा कायम राखली आहे. विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट गुणवत्तेसह नेत्रदीपक कामगिरी करत महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला असल्याची माहिती प्राचार्य डॉ. उत्तम शेलार यांनी दिली.



तृतीय वर्ष बी.सी.एस. विभागात कु. पायल लोंढे हिने सी.जी.पी.ए. ९.७४ गुणांसह प्रथम क्रमांक पटकावत आपल्या गुणवत्तेची चमक दाखविली. कु. तनुजा चौधरी व कु. वैभवी हांडे यांनी ९.४५ गुणांसह द्वितीय, कु. श्रद्धा हुलवळे हिने ९.४५ गुणांसह तृतीय, कु. सेजल गाजरे (९.२७), कु. ऋतुजा कोल्हे (९.१७) आणि कु. जागृती ढमाले (९.१६) यांनी अनुक्रमे पुढील क्रमांक मिळवून यशाची परंपरा अधिक समृद्ध केली.

तृतीय वर्ष वाणिज्य विभागात कु. सृष्टी साबळे हिने सी.जी. पी.ए. ९.०४ गुणांसह प्रथम क्रमांक मिळविला. कु. ऋतुजा गवांदे हिने ९.०४ गुणांसह द्वितीय, कु. मिताली लाडके (८.७३) तृतीय, कु. तेजल औटी (८.४८) चतुर्थ, तर कु. साहिल इनामदार (८.३९) यांनी पाचवा क्रमांक मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले. या यशामागे प्रा. गणेश बोरचटे, प्रा. अक्षय वाघ, प्रा. दिनेश जाधव, प्रा. विलास गवरी, डॉ. प्रणाली साळुंके, प्रा. शुभांगी लामखडे, प्रा. विशाखा निचित, प्रा. माधुरी झावरे, प्रा. आशिया चौगुले, प्रा. कल्याणी शेलार, प्रा. दत्तात्रय डंबाळे, प्रा. सीमा दराडे आणि डॉ. शिरीष गवळी यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांच्या या दैदिप्यमान यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष वसंतराव शेळके, उपाध्यक्ष माऊली शेळके, सचिव विवेक शेळके, विश्वस्त वल्लभ शेळके,माजी जिल्हा परिषद सदस्या सौ. स्नेहल शेळके, कॅम्पस डायरेक्टर प्रा. राजीव सावंत, डॉ. लक्ष्मण घोलप, प्रशासकीय अधिकारी प्रा. प्रदीप गाडेकर यांनी सर्व गुणवंत विद्यार्थी, पालक आणि प्राध्यापकांचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.